कल तपासणी व व्यवसाय मार्गदर्शन
१०वी ते पदवीपर्यंतच्या मुलांसाठी
करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी लागणाऱ्या क्षमता व आपल्या आवडीची क्षेत्रे जाणण्यासाठी कल तपासणी करून प्रशिक्षित तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घ्या. **चाचणी शास्त्रीयदृष्ट्या प्रमाणित व विस्तृत अहवालासह.** अनेक विद्यार्थी **IIT., IIM. मेडिकल, इंजिनिअर, Artificial Intelligence, Robotics** इत्यादी क्षेत्रात यशस्वी. प्रत्येक मुलाला वैयक्तिक ५ तासांचा वेळ दिला जातो. परगावच्या विद्यार्थ्यांसाठीही तपासणी ऑनलाईन उपलब्ध.
**मुलांचे भावनांक, अभ्यास कौशल्य, जीवन कौशल्य यासाठी सल्ला उपलब्ध.**
- अपॉइंटमेंटसाठी आधी वेळ ठरवा -
संपर्क - ०२४१-२३४५८४०, ९५१८५९८५८९
दुपारी १२ ते ४, पत्ता : चिरंजीव क्लिनिक, घुमरे गल्ली, अहमदनगर

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
दर रविवार - दालवाटी, चुरमा
* थाळीमध्ये दररोज आमरस *
(रेल्वे पार्सल सुविधा)
किटी पार्टी, बर्थ डे पार्टी करिता ५० जणांची उत्तम व्यवस्था
(आमरस - ४००/- रु. किलो मिळेल)
कापड बाजार, कोहिनूर शेजारी, अ. नगर

Volume - 72 | Issue- 198 | Marathi Daily | Saturday 13/4/2024 | Pages - 8 | Price- Rs. 3

# भारताचा भौगोलिक इतिहास



विविध विशेष
ज्ञानेश कुलकर्णी




'कच्छथीवू' भारत आणि श्रीलंका सागरी सीमेवरील एक निर्जन बेट. त्याच्या मालकीवरून उभय देशांत बऱ्याच काळापासून संभ्रम आहे. प्राचीन काळी रामनाथपुरम रामेश्वरमच्या रामनाद साम्राज्याच्या मालकीचे असणारे ब्रिटीश राजवटीत मद्रास प्रेसिडेन्सी अंतर्गत आले. १९२० साली श्रीलंकेने त्यावर दावा स्थापित केल्याने ते १९२१ मध्ये श्रीलंकेच्या हद्दीत गेले. तेव्हापासून या बेटावर ब्रिटीश सिलोन (आता श्रीलंका) यांचे नियंत्रण होते. दोन्ही देशांकडून प्रामुख्याने मासेमारीसाठी वापरण्यात येणारे हे बेट १९७४ पर्यंत विवादितच होते. १९७४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी भारत - श्रीलंका सागरी कराराअंतर्गत कच्छथीवू हे श्रीलंकन क्षेत्र म्हणून स्वीकारले. परंतु भारतीय संसदेने मान्यता न दिल्याने हस्तांतरणाच्या प्रक्रियेला भारतीय सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले.

पुढे २०१० मध्ये श्रीलंका सरकारने तामिळनाडू सरकारला नोटीस जारी केली की भारतीय न्यायालय १९७४ च्या कराराला रद्द करू शकत नाही. जून २०११ मध्ये तामिळनाडूच्या मुख्यमंत्री जे. जयललिता यांच्या नेतृत्वाखालील तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली की, श्रीलंकेला कच्छथीवू देण्याबाबत भारत आणि श्रीलंका यांच्यातील १९७४ आणि १९७६ चा करार असंवैधानिक ठरवावा. बेरुबारी खटल्यात न्यायालयाने निर्णय दिला की, भारतीय भूभाग दुसऱ्या देशाला देण्यास राज्यघटना दुरुस्तीद्वारे संसदेने मान्यता दिली पाहिजे.

फेब्रुवारी २०१४ मध्ये ते वादग्रस्त बेट श्रीलंकेला देताना त्या क्षेत्राचे सीमांकन झालेले नाही त्यामुळे तो देताना भारतीय मालकीचा कुठलाही भूभाग दिला गेला नाही किंवा सार्वभौमत्व सोडले गेले नाही.

हाच मुद्दा येत्या लोकसभा निवडणुकीत भाजपाकडून प्रचाराचा भाग म्हणून पुढे आणण्यात आला आहे. निवडणुकीचे राजकारण बाजूला ठेवले तरी याआधी भारताचे भूभाग शेजारील देशांना देण्याचे प्रयत्न झाले आहेत, ते प्रकाशित झाले नाही एवढेच.

भारताने श्रीलंकेला कच्छथीवू बेट दिल्यावरुन काँग्रेस आणि भाजपामध्ये अलिकडे जुंपली. परंतु देशाच्या दुर्दैवाने आपण असे आणखीही काही प्रकार केले आहेत. या आधी आपण ब्रह्मदेशाला कोबे नदीचे खोरे आणि कोको बेट दिले होते. चीनला अक्साई चीन भागामध्ये १९६० ते ६२ च्या दरम्यान भारताचा असाच मोठा भाग बळकावू दिला गेला. परंतु, अगदी परराष्ट्र मंत्रालयातीलही फार थोड्या लोकांना माहिती आहे की १९६३ मध्ये भारताने काश्मीरचा काही भागही पाकिस्तानला देण्याचा घाट घातला होता. विडंबना ही की, हा भाग भारताकडे राहण्यात कट्टर शत्रू झुल्फिकार अली भुट्टो यांनी योगायोगाने महत्त्वाची भूमिका पार पाडली. आज राजौरी-पूंछचा भाग भारतातच आहे, याचे श्रेय भुट्टोंच्या हटवादीपणाला जाते! अन्यथा आपण राजौरी, पूंछ आणि उत्तर काश्मीरच्या भागावर कधीच **(पान २ वर)**

## उठाठेव

- विवेक मेहेत्रे




अहो...असे दचकू नका..! शेठजी, मी नेहमीप्रमाणे खंडणी मागण्यासाठी आलेलो नाहीय!! ह्या साहेबांचा प्रचार करायला आलोय.., त्यांनाच तुमचं मत द्यायचं!!

### दोन्ही गटाच्या ३५ जणांवर गुन्हा दाखल

# नीलक्रांती चौकात राडा; चार जखमी

**समाचार/नगर-** दिल्लीगेट येथील नीलक्रांती चौकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गेल्या दोन दिवसांपासून विविध कार्यक्रम सुरू आहेत. शुक्रवारी (दि.१२) रात्री या चौकात सुरू असलेल्या कार्यक्रमादरम्यान मोठा वाद झाला. दोन गट आपसात भिडले. चॉपर, चाकुने परस्परांवर वार करण्यात आले. यावेळी तोडफोड करून खुर्च्यांची फेकाफेकी करण्यात आली. या घटनेत चारजण जखमी झाले असून दोन्ही गटातील ३५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांच्यासह कोतवाली व तोफखाना पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिस निरीक्षक प्रताप दराडे, आनंद कोकरे घटनास्थळी रात्री उशिरापर्यंत तळ ठोकून होते. या घटनेप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल अजय साळवे (रा. बालिकाश्रम रोड, नीलक्रांती चौक, नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, दि. १२ रोजी रात्री नऊ ते साडेनऊ दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भीम गीतांचा कार्यक्रम सुरु असताना सनी कांबळे, अंकुश कांबळे, सागर रोकडे, गौरव गायकवाड, अमोल गायकवाड, प्रतीक बारस्कर, अभी लोणारे, आकाश कांबळे यांच्या सांगण्यावरून विजय पठारे, राहुल झेंडे, रोहित कुचेकर, करण पाचारणे, सनी राजेंद्र पाथरे, सुमीत विजय शिंदे, अव्दित दिनेश शिंदे, राज चावरे (सर्व रा. सिध्दार्थनगर, नगर) हे त्यांच्यासोबत आणखी काही सात ते आठ इसम आले. कार्यक्रमाच्या स्टेजवर हातात पाईप, लाकडी दांडके व चाकु घेऊन येऊन आमचे लहुजींचे गाणे लावा, असे म्हणून शिवीगाळ, दमदाटी करून विजय पठारे याने त्याच्या हातातील चाकुने मला जिवे मारण्याच्या उद्देशाने माझ्या डोक्यात चाकु मारून मला तसेच एकनाथ गायकवाड, प्रतीक शिंदे यांना जखमी केले. तसेच इतरांनी दहशत निर्माण करून शिवीगाळ करत दमदाटी केली, असे फिर्यादीत म्हटले आहे. विजय राजु पठारे (रा. सिध्दार्थनगर, नगर) यांनी फिर्यादी दिली आहे. त्यांनी फिर्यादीत म्हटले की, दि. १२ रोजी रात्री नऊच्या सुमारास नीलक्रांती चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातील स्टेजवर गेलो असता, तेथे महापुरूषांचे फोटो खुर्चीवर पुजनाकरीता ठेवलेले होते. त्यामध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा फोटो न दिसल्याने, त्यांचा फोटो का ठेवला नाही, अशी मी अजय साळवे यांना विचारणा केली असता, त्याचा राग आल्याने अजय साळवे याचा मुलगा याने मला स्टेजवरून खाली ओढून त्याच्या हातातील तलवारीच्या उलटया बाजुने माझ्या खांद्यावर मारले तसेच गौरव साळवे याने मला जिवे मारण्याच्या उद्देशाने त्याच्या हातातील चॉपरने माझ्या डोक्यावर उजव्या बाजुला मारले. त्यात माझ्या डोक्याला दुखापत झाली आहे. तसेच येथे उपस्थित असलेले अजय साळवे, भप्या भोसले, बुग्गा उर्फ रूपेश तुळशीराम गायकवाड व इतर सात ते आठ अनोळखी (सर्व रा. नीलक्रांती चौक, नगर) यांनी मला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली, असे फिर्यादीत म्हटले आहे.

### पालकमंत्री विखे यांची पोलीस प्रशासनाला सूचना

## पॅलेस्टाईनचे झेंडे फडकवण्याच्या घटनेची सखोल चौकशी करा



**समाचार/नगर-** शहरातील ईदगाह मैदान परिसरात पॅलेस्टाईनचे झेंडे फडकवण्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या घटनेची सखोल चौकशी करावी, अशी सूचना पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी पोलीस प्रशासनाला केली.

सदर घटनेचा निषेध करून विखे म्हणाले की, काही अपप्रवृत्तींनी गालबोट लावण्याच्या हेतूने रमजान ईदच्या दिवशी प्रार्थनेच्या दरम्यान पॅलेस्टाईनचा झेंडा फडकवला. राज्यात व जिल्ह्यात रमजान ईद उत्साहात साजरी होत असताना अशी घटना घडणे, ही गंभीर बाब आहे. या घटनेची पोलीस प्रशासनाने कोणतीही हलगर्जी न करता सखोल चौकशी करावी तसेच पोलीस प्रशासनाने झेंडा फडकवणारे आणि त्यांना पाठबळ देणाऱ्या सूत्रधाराचा शोध घ्यावा, असेही ते म्हणाले. काही राजकीय पक्ष आपल्या जाहिरनाम्यातच फुटीरतावादी वृत्तीला प्रोत्साहन देत आहे, अशा घटनांमधून आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

विखे म्हणाले की, देशद्रोही वृत्ती कार्यरत असेल तर प्रशासनाने ती मुळापासून उखडून टाकण्याची गरज आहे. अशा देशद्रोही वृत्तीला कोणीही आश्रय देण्याची चूक करू नये, असे आवाहन पालकमंत्री विखे यांनी केले.

## निवडक

### भाजपाचे कर्नाटकमध्ये ऑपरेशन लोटस?

**बंगळरू -** लोकसभा निवडणुकीपूर्वी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी मोठा दावा केला आहे. भाजपा राज्यात ऑपरेशन लोटस सक्रिय करण्याचा प्रयत्न करत आहे. भाजपाने काँग्रेस आमदारांना पक्ष बदलण्यासाठी ५० कोटी रुपयांची ऑफर दिल्याचा आरोप सिद्धरामय्या यांनी केला.मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी एका वृत्त वाहिनीशी संवाद साधला. यावेळी कर्नाटकमध्ये काँग्रेस पक्षाचा लोकसभा निवडणुकीत पराभव झाला तर सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारही पडेल,असा आरोप भाजपाकडून करण्यात येत आहे. याबाबत सिद्धरामय्या यांना विचारण्यात आले असता ते म्हणाले, गेल्या एक वर्षापासून भाजपा आमचे सरकार पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी आमच्या आमदारांना ५० कोटींची ऑफरही दिली होती. त्यांनी प्रयत्न केले पण ते यशस्वी होऊ शकले नाहीत.




खा. सुजय विखे यांच्या प्रचाराच्या नियोजनासाठी भाजपा शहर व जिल्हा पदाधिकारी प्रबंधन आणि कोअर कमिटीची बैठक आज दुपारी नगरमध्ये पार पडली. या बैठकीस प्रदेश महामंत्री विजय चौधरी, शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, प्रा. भानुदास बेरड, महेंद्र गंधे, सचिन पारखी, सुनील रामदासी, प्रशांत मुथा, बाबासाहेब वाकळे, नितीन शेलार, महेश नामदे, प्रिया जानवे आदी उपस्थित होते. **(छाया- उदय जोशी)**

## खा. विखे यांच्या विजयासाठी कामाला लागा- चौधरी

**समाचार/नगर-** महायुतीचे उमेदवार खा. सुजय विखे यांच्या विजयासाठी भाजप पदाधिकाऱ्यांनी कामाला लागावे, असे आवाहन प्रदेश भाजपाचे महामंत्री विजय चौधरी यांनी केले.

खा. विखे यांच्या प्रचाराच्या नियोजनासाठी आज दुपारी नगरमध्ये पक्षाचे पदाधिकारी प्रबंधन आणि कोअर कमिटीची बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, प्रा. भानुदास बेरड, महेंद्र गंधे, सचिन पारखी, प्रशांत मुथा, **(पान ३ वर)**

चष्मा नको?
लग्नासाठी व विशेष करिअरसाठी बाधा येणाऱ्या चष्म्याचा नंबर पूर्ण व सुरक्षितपणे घालवून अनेकांच्या चष्माविरहीत जीवनासाठी...
- उपलब्ध सुविधा -
Touch Less Advanced Surface Ablation
Wavefront Optimised LASIK
Customized Wavefront Guided LASIK
TREK for Keratoconus I PTK for Corneal Scars
ICL / IPCL, Corneal Topography
जगातील सर्वांत वेगवान व सुरक्षित लॅसिक लेसर मशिन आता आपल्या अहमदनगरमध्ये..!
तसेच महाराष्ट्रात दुसरी मशीन
अचूक निदान I जलद गती
अचूक आय ट्रॅकिंग I स्पर्श न करता ट्रिटमेंट
चष्माविरहीत जीवनासाठी नेत्रतज्ञ डॉ. राजीव चिटगोपेकर यांचा सल्ला घ्या.
डॉ. चिटगोपेकर प्रकाश नेत्रालय
नगर-मनमाड रोड, डौले हॉस्पिटल शेजारी, ICICI बँकेच्या वर, १ला मजला, सावेडी, अहमदनगर. फोन नं. (0241) 2427171, 9420461117
aBhee

## जुन्या पिढीतील फळांचे व्यापारी हस्तीमल लोढा यांचे निधन



**समाचार/नगर**

नगरमधील जुन्या पिढीतील प्रथितयश फळांचे व्यापारी हस्तीमल लोढा (जामगाववाला) यांचे काल (दि. १२) वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते. फळांच्या व्यवसायात त्यांचा मोठा नावलौकिक होता. व्यवसायाबरोबरच सामाजिक आणि धार्मिक कार्यात ते सक्रिय होते.

बडीसाजन ओसवाल समाज संस्थेचे ते ज्येष्ठ सदस्य होते. त्याचबरोबर जैन वात्सल्य संस्थेच्या कार्यात त्यांचे सक्रिय योगदान होते. माणिक नगर बडीसाजन कार्यालय उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, सुना, नातू, नात सुना, पणतू असा मोठा परिवार आहे. पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी **(पान ३ वर)**

### अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचे पुरस्कार जाहीर

## प्रा. मधुसूदन मुळे यांना जीवन गौरव, संदीप दंडवते यांना युवा नाट्य गौरव पुरस्कार





**समाचार/नगर -** अखिल भारतीय मराठी नाटय परिषद अहमदनगर शाखेच्या वतीने दरवर्षी ज्येष्ठ आणि युवा या क्षेत्रात बहुमूल्य कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येते. या वर्षी जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ नाट्यकर्मी मधुसूदन मुळे यांना तर युवा नाट्य गौरव पुरस्कार संदीप दंडवते यांना जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती अध्यक्ष अमोल खोले यांनी दिली.

गेली पाच दशके नाटय सांस्कृतिक क्षेत्रात भरीव कार्य असणारे तसेच हौशी रंगभूमी,राज्य नाटय स्पर्धा यात सातत्याने योगदान असणारे तसेच नवीन आणि जुन्या पिढीतील कलाकारांना समन्वय साधून नवनवीन प्रयोग करणारे लेखक,दिग्दर्शक अभिनेते मधुसूदन मुळे यांना नाटय परिषद अहमदनगर शाखेच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार तर हौशी रंगभूमी, महाविद्यालयीन स्पर्धा आणि व्यावसायिक नाटक यात सातत्याने नवीन विषय, आशय आणि संकल्पना यांना मूर्त स्वरूप देऊन नगरचे नाव देशपातळीवर उज्वल करणारे युवा लेखक, दिग्दर्शक आणि **(पान ३ वर)**

आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी आजच गुंतवणूक करा
व्ही गार्डचा सोलार वॉटर हिटर घेऊन या..
वीज बिलात बचत करून आपले भविष्य सुरक्षित करा...
V-GUARD
V-GUARD Solar Water Heater MNES Approved
SS 304 L टँक
उत्तम दर्जाचे PUF इन्शुलेशन
60 LS 5000 LPD उपलब्ध
प्रेशराइज्ड मॉडेल्स उपलब्ध
Evacuated Tube Collector
(*अटी लागू)
V-GUARD Solar Water Heater
देशात सर्वाधिक विक्री होणारे व्ही गार्ड सोलार वॉटर हिटर
- अधिकृत विक्रेते -
प्रोप्रा. मिलिंद गंधे
आदित्य एन्टरप्रायजेस्
गुलमोहोर रोड, सावेडी, अ. नगर. 9325103781

(पान १ वरुन)

# भारताचा भौगोलिक इतिहास

तुळशीपत्र ठेवून पाणी सोडायला तयार झालो होतो. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले आणि त्यात आपला दारुण पराभव झाला हे सर्वश्रुत आहे. परंतु, त्यावेळी लडाख क्षेत्रामध्ये भारताची जरुर पिछेहाट झाली असली तरी पराभव झाला नाही. भारताला खरा धक्का तवांगच्या क्षेत्रामध्ये बसला. अरुणाचल प्रदेशच्या या भागात नेहरुंच्या वशिल्याने वर चढलेले जनरल कौल यांच्या कचखाऊ लष्करी नेतृत्वामुळे चीनला मोकळे रान मिळाले होते. त्यावेळी चीनी सैन्य आसामच्या खोऱ्यापर्यंत पोहोचते की काय, अशी स्थिती निर्माण झाली होती. नोव्हेंबर १९६२ मधील या लष्करी पराभवामुळे देशाचे राजकीय नेतृत्वसुद्धा पूर्णपणे खचले आणि आपले मनोधैर्य संपले होते. या परिस्थितीत पं. नेहरुंनी १९ नोव्हेंबर १९६२ रोजी अमेरिकेला लष्करी मदत मागितली. त्यावेळी अमेरिका सोव्हिएत संघाबरोबर क्युबाच्या पेचप्रसंगात गुंतला होता. त्यामुळे भारताकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नव्हता. परंतु, २२ नोव्हेंबर रोजी तो पेचप्रसंग संपला आणि अमेरिकेने भारताकडे लष्करी मदतीचा ओघ सुरू केला. अमेरिकन हवाई दलाची विमाने भारताच्या मदतीला येण्यास सज्ज करण्यात आली. हे सर्व बघून चीनने २१ नोव्हेंबर रोजी एकतर्फी युद्धविराम घोषित केला आणि आपले सैन्यही माघारी घेण्यास सुरूवात केली, हा इतिहास आहे.

त्या काळी पाकिस्तान अमेरिकेचा अत्यंत घनिष्ट मित्र होता आणि कम्युनिस्ट देशांविरुद्ध दोन्ही देशांची एकत्र आघाडी होती. त्याकाळी भारताबद्दल परराष्ट्र धोरण ठरवण्यात अमेरिका नेहमीच ब्रिटनच्या सल्ल्याने वागत असे. यामुळे पाकिस्तानशी काश्मीरप्रश्नावर वाटाघाटी करण्यासाठी भारताला भाग पाडण्यात आले. १९६३ च्या पहिल्या तिमाहीमध्ये दिल्ली, कलकत्ता आणि कराची येथे ही बोलणी झाली. भारतीय दलाचे प्रतिनिधित्व सरदार चरणसिंग करत होते तर पाकिस्तानचे प्रतिनिधी झुल्फिकार अली भुट्टो होते. सुरूवातीपासूनच संपूर्ण काश्मीर आपल्याला हवे असा पाकिस्तानचा आग्रह होता. भारताने पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये पाकिस्तानची मागणी धुडकावून लावली होती. अखेरीस ९ फेब्रुवारी १९६३ रोजी कराची येथे झालेल्या बैठकीमध्ये भारताने काश्मीरच्या फाळणीचा प्रस्ताव दिला. याला चरणसिंग यांनी शांतता आणि सहकार्याची रेषा (लाईन ऑफ पीस अँड कोलॅबरेशन) असे गोंडस नाव दिले. या प्रस्तावानुसार भारताने पूंछ आणि राजौरीतील पाकिस्तानमध्ये गेलेला भूभाग पाकिस्तानलाच देण्याचा प्रस्ताव ठेवला. त्याचप्रमाणे उत्तरेकडे बारामुल्लाच्या जवळील उरीचा भागही पाकिस्तानला देण्यास भारत तयार झाला होता. याच्या पूर्वेला किशनगंगा खोरे आणि गुरेज हा भागही भारत पाकिस्तानला देण्यास तयार होता. या मोबादल्यात पाकिस्तानने भारताला कारगील क्षेत्रातील एक-दोन ठाणी देण्याचा प्रस्तावही आपल्याकडून दिला गेला. हा प्रस्ताव अत्यंत गोपनीय ठेवला गेला होता.

भारताच्या सुदैवाने पूंछ आणि राजौरी पाकिस्तानला देण्याचा आपला प्रस्ताव भुट्टोंनी फेटाळून लावला होता. त्यानंतर त्यांनी विभाजनाची दुसरी रुपरेषा भारतापुढे मांडली. त्याप्रमाणे जम्मू आणि त्याच्या उत्तरेकडील भाग भारताकडे राहणार आणि बाकी अगदी चिनाब खोऱ्यापासून काश्मीर खोरे, दोडा जिल्हा हे सर्व पाकिस्तानला देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली होती. या मोबदल्यात लडाखच्या संरक्षणासाठी काश्मीर खोऱ्यातून भारतीय सैन्याच्या हालचालीला आपण मान्यता देऊ, असा विचार त्यांनी पुढे मांडला. अर्थातच संपूर्ण काश्मीर खोरे पाकिस्तानला द्यायला भारताने कधीच मान्यता दिली नाही. साहजिकच भुट्टोंच्या हटवादीपणामुळे आणि संपूर्ण काश्मीर मिळवण्याच्या राक्षसी इच्छेमुळे हा प्रस्ताव बारगळला, वाटाघाटी बंद पडल्या आणि चौथ्या फेरीतील चर्चेत भारताने आधीचा प्रस्ताव मागे घेतला. अर्थात त्याला आंतरराष्ट्रीय परिस्थितीही कारणीभूत होती. कारण तोपर्यंत रशिया आणि चीनमध्ये बेबनाव उघडकीला आला होता. रशियाने भारताला पाठिंबा देण्यास सुरूवात केली होती. त्यामुळे आपले अमेरिकेवरील अवलंबित्व कमी झाले होते. त्याचाच परिणाम म्हणून राजौरी, पूंछ आणि किशनगंगेचा भाग भारतामध्येच राहिला.

इतिहासात नेहमीच जर-तर हा प्रश्न उद्भवत असतो. त्यामागे जर भुट्टोंनी अतिशय युक्तीपूर्ण दावा केला नसता आणि भारताचा काश्मीरच्या दुसऱ्या फाळणीचा प्रस्ताव मान्य केला असता तर आज राजौरी-पूंछचा भाग आणि किशनगंगेचे खोरे तसेच उरी हे सर्व भाग आपल्याला पाकिस्तानमध्ये सामील झालेले दिसले असते. आजपर्यंत ही गोष्ट भारतीय लोकांपासून लपवून ठेवली गेली आहे. परंतु, पाकिस्तानला भूभाग देऊन शांतता प्रस्थापित करायची ही मानसिकता फक्त १९६३ पुरतीच मर्यादित नव्हती. कोणतेही भूभाग देऊन पाकिस्तानशी कोणत्याही किमतीत शांतता प्रस्थापित करावी, हाच भारतीय परराष्ट्र धोरणाचा गाभा होता. स्पष्ट सांगायचे झाले तर ३७० कलम रद्द करुन आणि काश्मीरमध्ये हिंसाचार न होऊ देता हे सर्व करता येईल अशी कोणत्याही सामरिक तज्ज्ञांची अपेक्षा नव्हती. मात्र मोदी सरकारने हा प्रश्न अत्यंत शांततेने हाताळला आणि काश्मीरबाबत खंबीरपणे निर्णय घेतला तो नक्कीच स्तुतीयोग्य आहे. देशाचे संरक्षण आणि परराष्ट्र धोरण हा खरे तर निवडणुकांचा विषय असू शकत नाही. परंतु, भारतात बोटचेपे लष्करी आणि परराष्ट्र धोरण व त्याविरोधात खंबीरपणे देशाच्या हितासाठी उभे राहण्याचे धोरण यातील हा मोठा फरक स्पष्टपणे दिसत आहे.

# नात्यांचे सर्व्हिसिंग : ओघवत्या कथा

प्रत्येकजण वेगवेगळ्या व्यवसायामध्ये कार्यरत असतो, पण कार्यरत असताना डोळसपणे येणाऱ्या समस्यांना तोंड देणे आणि त्यातून अनुभव जोडणे आणि त्या अनुभवाची योग्य शब्दांमध्ये मांडणी करणे या सगळ्या गोष्टी प्रत्येकाला जमतातच असं नाही. माणुसकीच्या नात्याने जगत असताना व्यवसायामध्ये अनेक आंबट गोड अनुभव येतात, असे अनुभव हेच आपलं संचित असतं. हे संचित योग्य शब्दांमध्ये मांडून त्याचं कथांमध्ये रूपांतर करणे हे विश्वास जयदेव ठाकूर यांना योग्य रितीने जमलेले आहे. नुसतंच योग्यरितीने म्हणून उपयोगाचे नाही तर लघुकथा या सदरात मोडणाऱ्या अनेक भल्याबुऱ्या कथा त्यांनी अनुभवल्या आणि लिखित स्वरूपामध्ये ओघवत्या भाषेत 'नात्यांचे सर्व्हिसिंग' या कथासंग्रहातून आपल्यासमोर मांडल्या आहेत. कथांचे स्वरूप छोटेखानी आहे, आटोपशीर आहे, भाषा कुठेही पाल्हाळीक नाही. अत्यंत सहज सोप्या आणि ओघवत्या भाषेमध्ये कथा मांडल्या आहेत, म्हणूनच त्या वाचकांना आपल्याशा वाटतात.




पुस्तकाचे नाव :नात्यांचे सर्व्हिसिंग
लेखक- विश्वास जयदेव ठाकूर
प्रकाशक -शब्द मल्हार प्रकाशन, नाशिक, मूल्य -९९/-



पुस्तक 'पीडी'या

प्रस्तूत कथासंग्रहामध्ये एकूण २५ कथा असून त्या माध्यमातून लेखकाने त्याला आलेले अनुभव अत्यंत लोभस पणे आपल्यासमोर मांडलेली आहेत. पहिलीच कथा 'नात्यांचे सर्व्हिसिंग' मध्ये आपण जे समजतो ती वस्तुस्थिती नसते. खोलात जाऊन सत्य समोर आल्यावर जे काही आपल्यासमोर येते ते विस्मयकारक असते. ही कथा वाचताना कोणत्याही वयातील माणसाबद्दल तात्काळ आपले मत बनवणे कसे चुकीचे असते हे सांगण्याचा प्रयत्न लेखक करताना दिसतो.

मराठीमध्ये एक म्हण आहे वड्याचं तेल वांग्यावर काढणे. या म्हणीची प्रचिती लेखकाला कशी आली याचं वर्णन 'चित्रपटाचा फ्लॅशबॅक' या कथेमध्ये वाचायला मिळते. मदत करणं हा काही माणसांचा स्थायीभाव असतो. यातूनच अनेक माणसं मदतीसाठी येत असतात. रोजच्या कामातील हा भाग नसतानाही मदत करणारी माणसं सतत पुढाकार घेत असतात. यातूनच आलेल्या अनुभवाचे कथन या कथेमध्ये वाचायला मिळते.

'घरातल्या घरात राजकारण' या कथेमध्ये आपण समजतो तेवढी राजकारणी मंडळी सरळ आणि सोप्पी नसतात. सज्ञनतेचा, चांगुलपणाचा मुखवटा धारण केलेली ही मंडळी स्वतःच्या नात्यागोत्यातील मंडळींबरोबर राजकारण खेळून त्यांना नामोहरम करण्यासाठी जे काही राजकारण करतात आणि त्यासाठी ओळखीच्या आणि परिचित माणसांचा वापर कशा पद्धतीने करतात याचे सुरेख वर्णन या कथेमध्ये वाचायला मिळते. अर्थात सर्व राजकारणी सारखे नसतात, काही अपवाद देखील असतात.

नोटबंदीच्या काळात अनेकांना भला बुरा अनुभव आलेला आहे. असाच अनुभव प्रस्तूत लेखकाला कशा पद्धतीने आला, नियमानुसार केलेल्या कामाचा पुढील काळात कसा त्रास झाला हे 'नोटबंदी नंतरचे कवीत्व' या कथेमध्ये खुमासदार पद्धतीने लेखकाने सांगितले आहे.

वेळप्रसंगी माणसाला कठोर निर्णय घ्यावे लागतात. या घेतलेल्या निर्णयामुळे आपली रक्ताची नाती कधीकधी दुखावली जातात. मग ही दुखरी जखम आयुष्यभर ठसठसत राहते याचा सल सातत्याने मनामध्ये राहतो. 'आयुष्यभर पुरणारी सल' या कथेतून लेखकाने हे फार करूण पद्धतीने मांडलेले आहे.

विश्वास ठाकूर हे सहकारी बँकिंग क्षेत्रामध्ये वावरणारं नाशिक मधलं प्रथितयश नाव. सध्याच्या परिस्थितीमध्ये सहकार क्षेत्राची जी काही सर्वत्र वाताहत होत आहे, ती पाहिल्यावर विश्वास ठाकूर सारखी माणसे ठळक उठून दिसतात. बँकिंग क्षेत्रातील आलेल्या भल्या बुऱ्या अनुभवातून हा कथासंग्रह आकाराला आलेला आहे. आपण सामान्य ठेवीदारांच्यावतीने ट्रस्टी म्हणून काम करत असताना प्रामाणिकपणे काम करणं, हे आपलं नैतिक कर्तव्य आहे आणि त्या कर्तव्यातूनच बऱ्याच वेळेला कठोर निर्णय घेणे क्रमप्राप्त होते. या घेतलेल्या निर्णयामुळे अनेक माणसं जोडली जातात, तुटली जातात, कायमची दूर जातात. काही वेळेस कटुता पदरी पडते तर काही वेळेस मानसिक समाधान मिळून जाते. म्हणूनच जी काही आपण नाती जोपासलेली असतात त्यासाठी वेळोवेळी सर्व्हिसिंग करणं गरजेचं असतं. म्हणूनच तर या कथासंग्रहाला नात्यांचे सर्व्हिसिंग असे नाव देण्यात आलेले आहे. काही ठिकाणी नाती उपयुक्त असतात तर काही ठिकाणी ती अडथळा असतात तर काही ठिकाणी धर्मसंकट उभे करतात. अशा वेळेला माणसाच्या प्रामाणिकपणाची कसोटी लागते. अनुभवाच्या जोरावर प्रस्तूत पुस्तकाचे लेखक विश्वास जयदेव ठाकूर प्रामाणिकपणाच्या सोचोटीवर उतरलेले दिसून येतात. सतरा आवृत्ती निघालेले हे पुस्तक वाचनीय आहे, विलोभनीय आहे, आणि एक प्रांजल प्रामाणिक कथन देखील आहे. सर्वांनी वाचावं असंच हे पुस्तक आहे.

**– पी. डी. कुलकर्णी**




## राशीभविष्य

- **मेष :** वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. व्यवसायात नवे बदल होतील. प्रकृतीच्या छोट्या तक्रारी राहतील.
- **वृषभ :** महत्त्वाच्या घटनांनी दिलासा मिळेल. घरगुती व्यवसायात उत्तम लाभ होईल. समाधानी रहाल.
- **मिथुन :** छोट्या-मोठ्या प्रवासाचे योग आहेत. गुंतवणुकीला चालना मिळेल. थोरांचा सहवास लाभेल.
- **कर्क :** नोकरीत वरिष्ठांची नाराजी संभवते. कामाचा ताण वाढेल. वाद-विवादापासून दूर रहायला हवं.
- **सिंह :** महत्त्वाची कामं मार्गी लागतील. व्यवसायातील अडचणी दूर होतील. कौटुंबिक सौख्य लाभेल.
- **कन्या :** प्रक्रिया उद्योगात अनुकूलता राहील. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **तूळ :** किरकोळ प्रश्नांचा अधिक विचार नको. आत्मविश्वासाने कार्यरत रहावं. प्रवास लांबणीवर टाकावा.
- **वृश्चिक :** भागीदारी व्यवसायात समस्या संभवतात. विचाराने रहावं. प्रयत्नातील सातत्य कामी येईल.
- **धनु :** वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. नोकरीत समस्या संभवतात. कुलदेवतेची उपासना करावी.
- **मकर :** आजचा दिवस फलदायी ठरेल. महत्त्वाच्या योजना मार्गी लागतील. प्रवासात काळजी घ्यावी.
- **कुंभ :** नोकरीत बदली, बढतीचे प्रयत्न होतील. अनावश्यक खर्च टाळावा. प्रलोभनांपासून दूर रहावं.
- **मीन :** विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. कार्यप्रवणतेतून उत्कर्ष होईल. आत्मविश्वास वाढीस लागेल.

सल्ला मोलाचा

## फायदे योगासनांचे

शरीरस्वास्थ्य टिकवायचे असल्यास योगासनांसारखा चांगला उपाय नाही. विशेषतः चाळिशीनंतर रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. त्यावेळी आसने केलेली चांगली. शरीराला प्रमाणबद्धता मिळवण्यासाठीही योगासनं केली जातात. मेंदू, मज्जातंतू आणि पाठीचा कणा यांचे कार्य उत्तमरितीने चालावे यासाठी योगासने पूरक ठरतात. प्रत्येक स्त्री ऋतुप्राप्ती, प्रसूती आणि रजोनिवृत्ती या तीन टप्प्यांत आयुष्याचा प्रवास करते. या टप्प्यांमध्ये शरीरावर नियंत्रणं ठेवणं, शरीर आटोक्यात ठेवणं हे काम कळत-नकळतपणाने योगासनांमुळे होते. त्यासाठी मात्र तुम्हाला योगतज्ज्ञांची मदत घ्यायला हवी. कोणतेही आसन करताना आत्मपरीक्षण करावं. नव्यानं आसन करताना शरीराचे अवयव दुखतात. मात्र, सरावानं हा त्रास कमी होतो, दूर होतो. आसनांसाठी वयाचं बंधन मुळीच नाही. दिवसभरात वेळ मिळेल, तेव्हा योगासने करावीत. मात्र, एकच वेळ निश्चित असावी. जेवणाची वेळ आणि योगासनाची वेळ यात कमीत कमी दोन ते तीन तासांचे अंतर ठेवावे. पश्चिमोत्तानासन, सर्वांगासन, हालासन या आसनांमुळं थकवा निघून जातो.

## १४ एप्रिल

दिन विशेष

- **१८९१ :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म.
- **१९२२ :** मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब यांचा जन्म.
- **१९२७ :** विनोदी लेखक द. मा. मिरासदार यांचा जन्म.
- **१९९५ :** टेबल टेनिसमध्ये सलग ६,६७० रॅलीज करण्याचा जागतिक विक्रम डॉ. रमेश बाबू यांनी पुण्यात नोंदवला.

महत्त्वपूर्ण काही...

## समुद्रतळाची अनोखी सफर...

समुद्राच्या खोलीत दडलेले जीव जगतात कसे याबद्दल जाणून घ्यावंसं वाटतंच. आपण विचारही करू शकत नाही, असे त्यांचे जग आहे. चला तर मग, जाणून घेऊ यात त्यांचं जग. ✻ जेलीफिश हा समुद्री जीव तब्बल ६५० दशलक्ष वर्षांपासून पृथ्वीवर अस्तित्वात आहे. जेलीफिशचा इतिहास डायनासोर आणि शार्क यांच्यापेक्षाही बराच जुना आहे. ✻ इलेक्ट्रीक इल या प्राण्यामध्ये १० बल्ब पेटतील इतकी वीज निर्माण करण्याची क्षमता असते. ✻ झोपताना डॉल्फिन्सचा एक डोळा उघडा आणि अर्धा मेंदू जागृत असतो. त्यांना आपल्या शत्रूवर किंवा धोक्याकडे लक्ष ठेवता येते. ✻ ऑक्टोपसला तीन हृदयं असतात. ✻ ब्लू व्हेल माशांच्या आवाजाची तीव्रता १८८ डेसिबल इतकी असते. ✻ ऑयस्टर किंवा शिंपल्यातील प्राणी गरजेनुसार आपलं लिंग बदलू शकतो. ✻ समुद्री प्रवाळाचीही गंमत आहे. त्यांना डोकं, तोंड, हाडं, हृदय, फुफ्फुस, मेंदू असा कोणताही अवयव नसतो. तरीही त्यांची गणना सजीवांमध्ये होते. ✻ कोळंबीचं हृदय त्याच्या डोक्यात असतं. ✻ पृथ्वीवर पाणघोडा हा असा एकमेव प्राणी आहे ज्याची मादी नाही तर नर पिल्लांना जन्म देतो.

## पंचांग

**रविवार, १४ एप्रिल २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
चैत्र शु. ६, नक्षत्र : आर्द्रा
चंद्रराशी : मिथून, अतिगंड योग
सूर्योदय: ६.२४, सूर्यास्त: ६.५४

## फॉरवर्डस

**आयुष्यात कधीही हताश होऊ नये. सब्र का फल मीठा होता है असं म्हणतात ते काही खोटं नाही. कारण...**मेहनत का फल और समस्या का हल देर से ही सही पर मिलता जरूर है।

आरोग्यमंत्र

## धूम्रपानामुळे मोतीबिंदू ?

अलिकडे मोतिबिंदूचं प्रमाणही वाढत चालल्याचं पहायला मिळत आहे. त्यात धूम्रपानामुळे मोतिबिंदू होण्याची शक्यता अनेकपटींनी वाढते. धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींना मोतिबिंदू होण्याची शक्यता दुपटीने जास्त असते, असं एका अभ्यासातून समोर आलंय.



✻ 'मॅक्युलर डिजनरेशन' ही वयानुरूप निर्माण होणारी समस्या आहे. याला 'एएमडी' असंही म्हटलं जातं. यामुळे रेटिनाच्या केंद्रस्थानावर विपरित परिणाम होतो. धूम्रपान करणाऱ्यांना या विकाराची शक्यता बरीच असते. यामुळे दृष्टीवर परिणाम होऊ शकतो.

✻ डोळ्याच्या मधल्या थराशी संबंधित 'युव्हीआयटिस' हा विकार आहे. यामुळे दृष्टी पूर्णपणे अधू होऊ शकते. धूम्रपानाची सवय असेल तर या विकाराची शक्यता २.२ पटींनी वाढते.

✻ धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींना डायबेटिक रेटिनोपॅथीची समस्या निर्माण होऊ शकते. यात रेटिनाशी संबंधित रक्तवाहिनीला धोका पोहोचतो. टाईप १ किंवा टाईप २ डायबिटिस असणाऱ्यांनी धूम्रपान करू नये.

✻ धूम्रपानामुळे ड्राय आय सिंड्रॉम होऊ शकतो. या विकारात डोळ्यांच्या पृष्ठभागावर अश्रूंची निर्मिती होत नाही. अश्रूंच्या कमतरतेमुळे डोळे लाल होतात तसंच खाजतात. धूम्रपानाचं व्यसन असणाऱ्यांना ही समस्या निर्माण होण्याची शक्यता बरीच जास्त असते.

✻ धूम्रपान करणाऱ्या गरोदर महिलांच्या मुलांना डोळ्यांचे विकार होऊ शकतात. त्यामुळे गरोदरपणात धूम्रपान करू नये.


## टेक्नो टॉक

कार रेसिंग, शुटींग आणि अन्य प्रकारच्या व्हीडिओ गेमिंगची वाढती आवड, इंटरनेट सेवांमधील सुधारणा तसेच मोबाईल, कॉम्प्युटरचा वाढता वापर हे लक्षात घेता आपल्या देशात व्हीडिओ गेमिंगचा व्यवसाय सुमारे २५ ते २० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याच्या शक्यता वर्तवण्यात येत आहेत. सध्या देशात व्हीडिओ गेमिंगचा व्यवसाय दोन ते तीन अब्ज डॉलरचा असून त्यामध्ये दर वर्षी ६० ते ७० टक्के वेगाने वाढ होत आहे. स्मार्टफोन आल्यावर व्हीडिओ गेमिंगच्या व्यवसायात लक्षणीय वाढ झाली असून आता लोक पहिल्यापेक्षा जास्त गेम खेळू लागले आहेत.

करिअरवाटा

## व्यावसायिक संगीतकार होताना...

संगीताची मनापासून आवड असेल आणि याच क्षेत्रात करिअर करायचं असेल तर रॉक अँड पॉप म्युझिकचा पर्याय विचारात घेण्यासारखा आहे. ऑस्ट्रेलियापासून जपानपर्यंतचे अनेक विद्यार्थी लंडनच्या ट्रिनिटी कॉलेजमध्ये रॉक अँड पॉप म्युझिकचे धडे घेतात. दिल्लीच्या ट्रिनिटी कॉलेजमध्येही हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. या ठिकाणी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व्हावे म्हणून काही व्यावसायिक संगीतकार उपस्थित राहतात. ते या संगीत प्रकारातल्या अनेक सीडीजचा आधार घेत विविध संगीत रचना स्पष्ट करतात. विद्यार्थ्यांना नवीन साँग बुक्स उपलब्ध करून दिले जातात. त्यात सूचना, स्वरांचे नोटेशन्स, त्या त्या गाण्याची पार्श्वभूमी असा मजकूर असतो. गिटार, बास, ड्रम्स, या वाद्यांचाही अंतर्भाव यात आहे. रॉक अँड पॉप म्युझिकच्या विश्वातील श्रेष्ठ संगीतकारांच्या प्रशिक्षणाचा लाभ विद्यार्थ्यांना होतो. हा अभ्यासक्रम मुक्त विद्यापीठाच्या धर्तीवर आहे. काही संगीतकार स्वत:च्या अनुभवाच्या आणि जन्मजात अवगत कलेच्या जोरावर क्लासेस चालवतात. त्यांनाही शास्त्रीय अभ्यास करून परीक्षेला बसता येईल. मात्र, यात उत्तीर्ण होणे प्रतिष्ठेची बाब असेल. कारण प्रशिक्षणातून प्रत्येकाला या संगीत प्रकाराचा तपशीलाने अभ्यास करावा लागणार आहे.



खेचाखेची

## तपासणी

ऑफिसमधील दिवसभरच्या कामाने थकून गेलेला नवरा घरी येतो आणि आल्या आल्या बायकोला म्हणतो, 'प्यायला पाणी आणं गं लवकर'.

.

**बायको :** इतकी तहान लागली आहे का?

.

.

**नवरा :** (संतापून) नाही. माझा गळा कुठून लीक होतोय का, ते तपासायचंय.

वेगळं काही

जगात अनेक आश्चर्यकारक गोष्टी असतात. त्यामुळे त्या इतरांचं लक्ष आपल्याकडे वेधून घेतात. आता हे झाडच पहा ना! एकीकडे माणूस वृक्षतोड करुन जमिनीवर कब्जा मिळवत असताना दुसरीकडे हे झाड मात्र मानवी वस्तूंवर कब्जा करत आहे. हे छायाचित्र पाहिल्यावर एक गोष्ट लक्षात येते. ती म्हणजे या झाडाच्या विकासाच्या मार्गात जे काही आलं त्या साऱ्यांवर या झाडाने कब्जा मिळवला आहे. अशी अनेक छायाचित्र पहायला मिळतात ज्यामध्ये झाडांनी स्वत:चा विकास करताना त्या आड येणाऱ्या सर्व मानवी वस्तूंना आपल्या जाळ्यात ओढलं आहे.

रूचिरा

## चटपटीत पनीर विथ ब्रोकोली

उन्हाळ्यात तेच तेच पदार्थ खाण्याचा कंटाळा येतो. अशा वेळी पनीर विथ ब्रोकोली हा प्रकार तुमच्या खास आवडीचा ठरेल. बघू या कशी बनवायची ही डिश...



**साहित्य :** दोन टेबलस्पून दही, अर्धा टी स्पून आलं-लसूण पेस्ट, अर्धा टी स्पून धने पूड, लाल तिखट, कसूरी मेथी, एक टी स्पून लिंबाचा रस, तेल, ५० ग्रॅम कांदा, दोन ढोबळी मिरची (काप केलेली), ५० ग्रॅम ब्रोकोली (चिरून), एक टी स्पून काळी मिरीपूड, लिंबूचा रस, अर्धा टेबलस्पून बटर, चवीपुरतं मीठ इत्यादी.

**कृती :** एका बाऊलमध्ये दही, आलं लसूण पेस्ट, धने पावडर, लाल तिखट, मीठ, कसूरी मेथी आणि लिंबाचा रस एकत्र करावं. पनीरचे गोल काप करून दह्यामध्ये मॅरिनेट करण्यास ठेवावे. कढईमध्ये तेल गरम करून कांदा, ढोबळी मिरची परतून घ्यावी. या मिश्रणात ब्रोकोली, मीठ, काळी मिरी पूड, लिंबाचा रस घालून तीन ते चार मिनिटं वाफवून घ्यावं. तव्यावर बटर गरम करून त्यात पनीरचे काप फ्राय करुन घ्यावे. नंतर एका प्लेटमध्ये गोल मोल्ड ठेवावे. त्यामध्ये ब्रोकोलीचं मिश्रण भरावं. चमच्याने दाब देऊन मिश्रण सेट करून घ्यावं. त्यानंतर मोल्ड काढून टाकावा. ब्रोकोलीच्या मिश्रणावर पनीरचे गोल काप ठेवावे. ढोबळी मिरचीच्या कापांनी सजावट करावी.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी.
दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

समाचार

शनिवार, दि. १३ एप्रिल २०२४ पान ३

## सुविचार

आपण आपल्या आजूबाजूच्या लोकांना बदलू शकत नाही पण कोणाच्या आजूबाजूला राहायचं हे बदलू शकतो.

(संकलित)

## सामान्यज्ञान

ब्रिटनमधील पहिली हवाई सुंदरी मिस दाफेन किर्टो ही १६ मे १९३६ रोजी १९ वर्षांची होती.

संकलन - अरविंद ब्राम्हणे

# सोने किती वाढणार?



इस्राईल--हमास युद्धात आता इराण उतरण्याच्या शक्यतेने मागील आठवड्यापासूनच सोन्याच्या किमतीत रोज नवे उच्चांक दिसत आहेत. एक एप्रिल रोजी सीरियामधील इराण दूतावासावर इस्राईलने केलेल्या हल्ल्यात काही अतिउच्च पदावरील इराणी लष्करी अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला होता. संतप्त झालेल्या इराणकडून इस्राईला प्रत्युत्तर दिले जाण्याच्या शक्यतेने भू राजकीय तणाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

मध्यपूर्वेतील परिस्थिती बिघडल्यास अमेरिकन डॉलर्स आणि ट्रेझरी ईल्ड कडे दुर्लक्ष करून जागतिक गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक म्हणून यापुढेही सोन्यामधील खरेदी चालू ठेवतील. गोल्ड सिल्वर रेशो प्रमाणे त्यामुळे चांदीच्या




किमतीतही वाढ दिसू शकेल. सामान्य गुंतवणूकदार वाढलेल्या भावात सोन्यात खरेदी करीत नसला तरी जागतिक सट्टे बाजारात मात्र युद्धाची प्रत्येक बातमी सोन्याच्या बाजारभावावर परिणाम करीत राहील. युद्धाची जोखीम कमी झाल्यास भावात उतरण दिसू शकेल. गोल्डमन सॅक्स या जागतिक गुंतवणूक संस्थेने चालू वर्ष अखेरीस सोन्याचा जागतिक बाजारभावाचा अंदाज २७०० डॉलर प्रति स असू शकेल असा अंदाज व्यक्त केला आहे.

मार्च महिन्यातील देशांतर्गत किरकोळ महागाई दर ४.८५ टक्क्यांच्या नीचांकीपातळी पर्यंत येऊनही वाढलेल्या जागतिक तणावाने कच्च्या तेलाने उसळी मारल्यास महागाई दरवाढीची चिंता कायम राहणार आहे. शेअरबाजारातील गुंतवणूकदारांसाठी समाधानाची बाब म्हणजे देशाच्या औद्योगिक उत्पादनात यंदा फेब्रुवारी महिन्यात मोठी वाढ होऊन उत्पादनाचा निर्देशांक ५.७ % पर्यंत वाढला आहे. यामध्ये मुख्यत्वे खनिजे उत्पादन, ग्राहकोपयोगी वस्तू व वीजनिर्मिती क्षेत्राचे जास्त योगदान राहिले. पनामा व चिली मधील कमी होणारे तांबे उत्पादन, पुढील तीन-चार वर्षात जगभरातील ऊर्जा संक्रमण, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाची मागणी, डीकार्बोनायझेशन असे विविध घटक एकत्रित येण्याच्या परिणामी जागतीक कमोडिटीमध्ये तांबे धातूवरील सट्टा तेजीच्या बाजूने वाढत आहे. त्याचा परिणाम खनिज उत्खनन करणाऱ्या कंपन्यांवर दिसू लागला आहे.

**- राजेश देशपांडे**
**देशपांडे इन्व्हेस्टमेंट, अ.नगर**
**M.9850724890**

## इंदूबाई शिंदे यांचे निधन



**समाचार/नगर-**

इंदूबाई भानुदास शिंदे (वय ६६, रा.विसापूर ता.श्रीगोंदा) यांचे नुकतेच निधन झाले.

त्यांच्या पश्चात १ विवाहित मुलगा,५ विवाहित मुली,नातवंडे असा मोठा परिवार आहे. तुकाराम शिंदे यांच्या त्या आई होत. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

### आयुक्त डॉ. जावळे यांच्या अधिकाऱ्यांना बैठकीत सूचना

# मनपाचे मतदान जनजागृती अभियान

**समाचार/नगर-**



लोकसभा निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार शहरांमधील नागरिकांमध्ये मतदाना संदर्भात जनजागृती करणार आहे या माध्यमातून मतदानाचा टक्का वाढविला जाणार आहे. तसेच विविध स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे, याचबरोबर नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन केले जाणार आहे, सायकल रॅली, सेल्फी पॉईंट, पथनाट्य, माहिती फलक लावण्यात येणार आहे, तसेच १८ वर्षापुढील नवीन मतदारांना मतदानाचा हक्क बजवण्यासाठी माहिती दिली जाणार आहे अशी माहिती आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी दिली.

अहमदनगर महानगर पालिकेच्या वतीने लोकसभा निवडणुकीबाबत उपाययोजना करण्यासंदर्भात आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेत सूचना दिल्या. यावेळी उपायुक्त मुंडे, उपायुक्त सपना वसावा, शहर अभियंता मनोज पारखे, अस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, जल अभियंता परिमल निकम, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे, अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ आदींसह प्रभाग अधिकारी उपस्थित होते.

शहरातील मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती व्हावी यासाठी घंटागाडी द्वारे प्रबोधन केले जाणार आहे. तसेच मतदानाचा हक्क बजावण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित केले जाईल तसेच निवडणूक आयोगाचे निर्देश तंतोतंत पाळले जाईल व आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल असे मत आयुक्त डॉ. जावळे यांनी व्यक्त केले.

## लक्ष्मीबाई भोईटे यांचे निधन

**समाचार/नगर-**



जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त लेखाधिकारी निवृत्ती भोईटे यांच्या पत्नी लक्ष्मीबाई भोईटे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नगर शहरातील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे एक मुलगा, मुलगी, सून, जावई नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा परिषदेचे कर्मचारी श्रीकांत भोईटे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## धनादेश न वटल्याने आरोपीस दोन महिने कारावास

**समाचार/नगर-**

परतफेडी पोटी दिलेला धनादेश न वटल्याने न्यायालयाने आरोपीस कारावास व नुकसान भरपाई देण्याचा आदेश दिला.

फिर्यादी विजय रमेशलाल गांधी यांनी आरोपी अक्षय चंदुलाल उर्फ चंदू उर्फ चंद्रकांत शिंगी यांना उसनवारी रक्कम रु. २ लाख दिले होते. सदर रक्कम परतफेडी पोटी आरोपी यांनी फिर्यादी यांना त्यांचे खाते असलेले बँकेचा चेक दिल. सदर चेक नवटता परत आला त्याबाबत फिर्यादी यांनी वकीलामार्फत नोटीस देवून ही आरोपी यांनी सदर रक्कम दिली नाही. म्हणून फिर्यादी विजय गांधी यांनी नगर येथील अति.मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात आरोपी अक्षय शिंगी यंचे विरुध्द खटला दाखल केला. सदर खटल्याची गुणेदोषावर चौकशी होवून सदर गुन्हा सिध्द झाल्याने अति मुख्य न्यायदंडाधिकारी पारवे साहेब यांनी आरोपी यास दोषी धरुन २ महिने साधा कारावास व रुपये ३ लाख नुकसान भरपाई देण्याचे आदेश पारित केला. नुकसान भरपाई न दिल्यास १ महिना साधा कारावासाची शिक्षा भोगावी असा आदेश पारित केला. फिर्यादीच्यावतीने ॲड. वर्धमान भंडारी, ॲड. राजलुल देसरडा व ॲड. दुर्गा परदेशी यांनी काम पाहिले.

### खा. सुजय विखे यांचे पिंपळगाव लांडगा येथे प्रतिपादन

# नगर जिल्ह्यात रोजगाराच्या संधी निर्माण करणार

**समाचार/नगर-**



नगर जिल्हा हा राज्याच्या राजकारणात महत्वाची भूमिका बजावणार जिल्हा आहे. नगर जिल्ह्यातील तरूणांना जिल्ह्यातच रोजगार निर्माण होण्यासाठी प्रयत्नशील असून जिल्ह्यात चांगले उद्योग यावेत, यासाठी आपला प्रयत्न राहणार आहे, असे प्रतिपादन खा. सुजय विखे यांनी केले.

नगर तालुक्यातील पिंपळगाव लांडगा येथे कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात होता. त्यावेळी खा. विखे बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डिले उपस्थित होते. खा. विखे म्हणाले की, जिल्ह्यातील तरूणांना रोजगारासाठी जिल्ह्याच्या बाहेर जावे लागते. ही बाब लक्षात घेऊन दोन वर्षाच्या महायुती सरकार काळात जिल्ह्यात औद्योगिक वसाहती उभारण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले. वडगाव गुप्ता व शिर्डी येथे औद्योगिक वसाहतीला मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे तरुणांना रोजगार मिळणार आहे.

दोन वर्षापूर्वी राज्यात हप्ता वसूल सरकार होते. त्यावेळी फारसे प्रयत्न करता आले नाहीत, अशी टीका त्यांनी महाविकास आघाडी सरकारवर केली. श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथे शासनाची ६१८ एकर जमीन विनामुल्य मिळवत औद्योगिक वसाहतीचा पाया रचला आहे. जिल्ह्यात रोजगार निर्मीती होऊन हजारो तरूणांच्या हाताला काम मिळणार आहे. स्थानिक ठिकाणी रोजगाराच्या संधी मिळाल्याने तरुणांचे मनोबल वाढणार असून त्यामुळे नगर जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे, असे सांगून खा. विखे पुढे म्हणाले की, केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून मोठा निधी मिळवला आहे. ग्रामीण भागातील रस्ते, महामार्गाची कामे झाली. १ हजार ४५४ कोटी रुपयांचा निधी मिळवत सहा राष्ट्रीय महामार्गाचे काम केले. गावागावात वाहतुकीच्या सुविधा पोहचाव्यात, यासाठी १३६.१३ कोटी रुपयांचा निधी मिळवत २९ गावांमध्ये रस्त्यांचे जाळे उभे केले आहे, असेही त्यांनी सांगितले.

## पान १ वरुन

### हस्तीमल लोढा यांचे निधन

सदस्य वसंत लोढा, कांद्याचे व्यापारी पारस लोढा, दैनिक लोकयुगचे माजी संपादक व बडीसाजन ओसवाल श्री संघाचे संचालक पोपट लोढा यांचे ते वडील होत, तर माजी नगराध्यक्षा लता लोढा यांचे ते सासरे होत. हस्तीमल लोढा यांच्या पार्थिवावर आज दुपारी नालेगाव येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या वेळी प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख दिलीप सातपुते, लोकआवाजचे संपादक विठ्ठल लांडगे, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, प्रा.भानुदास बेरड, महेंद्र गंधे, किशोर डागवाले, सचिन पारखी, सीए ज्ञानेश्वर काळे, माजी नगरसेवक दीप चव्हाण, मनोज गुंदेचा, पतसंस्थांच्या वतीने सुरेश वाबळे, व्यापाऱ्यांच्या वतीने अनिल पोखरणा, सुभाष मुथा, प्रेमराज बोथरा, नितीन कुंकुलोळ, मोहन मानधना, डॉ. श्रीधर दरेकर, बाळासाहेब वाळके यांच्यासह अनेक मान्यवरांनी हस्तीमल लोढा यांना श्रद्धांजली अर्पण केली.

### मराठी नाटय परिषदेचे पुरस्कार जाहीर

अभिनेते तसेच मराठी चित्रपट क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे संदीप दंडवते यांना युवा नाटय गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. येत्या रविवारी (दि. १४) येथील माऊली सभागृह येथे मनपा प्रशासक तथा आयुक्त डॉ.पंकज जावळे यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती मध्यवर्ती नाटय परिषद कोषाध्यक्ष सतीश लोटके आणि उपाध्यक्ष शशिकांत नजान यांनी दिली.जिल्ह्यातील सर्व नाटयकर्मी,सदस्य आणि रसिक यांनी सदर कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन अध्यक्ष अमोल खोले आणि सर्व सदस्य यांनी केले आहे.

### खा. विखे यांच्या विजयासाठी कामाला लागा- चौधरी

सुनील रामदासी, सदाशिव देवगावकर, महेश नामदे, प्रिया जानवे, नितीन शेलार, बाबासाहेब वाकळे आदी उपस्थित होते. चौधरी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नमस्कार पत्र, मोदी परिवार स्टिकर्सच्या माध्यमातून समाज घटकाशी सर्व पदाधिकाऱ्यांनी संवाद साधावा. बुथवरची लढाई जिंकण्याची जबाबदारी पक्षाने दिली आहे. मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी भाजपा पदाधिकाऱ्यांनी कसोशीने प्रयत्न करावेत, असे चौधरी यांनी सांगितले.

## रामनवमीची अयोध्येत जोरदार तयारी

**अयोध्या** - प्रभू श्रीराम तब्बल ५०० वर्षांनंतर अयोध्येत भव्य-दिव्य अशा राम मंदिरात विराजमान झाले. प्रभू श्रीरामाचा प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न झाला, त्याला आता तीन महिने उलटले आणि अशातच आता रामनवमीची चाहुल लागली आहे. प्रभू श्रीराम मंदिरात विराजमान झाल्यानंतरची ही पहिलीच रामनवमी आहे. त्यामुळे, या सोहळ्याला खास महत्त्व प्राप्त झाले आहे. रामनवमी सोहळ्यासाठी अयोध्येत जोरदार तयारी सुरू आहे.

रस्तोरस्ती रांगोळ्यांचा सडा, फुलांची सजावट, डोळे दिपवून टाकेल, अशी रोषणाई, लक्ष लक्ष दिव्यांनी उजळून निघालेला आसमंत, तेवत असलेल्या लाखो पणत्यांच्या प्रकाशाने सजीवपणा पांघरलेला शरयूतीर, मनमोहक फुलांच्या सजावटीने सजून बसलेली राम मंदिराची प्रत्येक भिंत अन् रामनामात चिंब भिजलेली लाखो रामभक्तांची मांदियाळी असणार आहे.

### संभाजी ब्रिगेडच्या शिष्टमंडळाने घेतली शरद पवारांची भेट

# संविधानाच्या रक्षणासाठी संभाजी ब्रिगेड मैदानात- राजेश परकाळे

**समाचार/नगर-**



लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने संभाजी ब्रिगेडची प्रचार यंत्रणा सक्रिय सहभागी झाली असून नियोजपूर्वक प्रचार चालू आहे. यादरम्यान संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांना शरद पवार यांनी भेटीसाठी बोलावले असता संभाजी ब्रिगेडचे शिष्टमंडळ पवारांना भेटले. यावेळी विविध विषयावर चर्चा केली.

संभाजी ब्रिगेडचे नगर जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांनी संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष मनोज आखरे, महासचिव सौरभ खेडेकर यांच्या बरोबर चर्चा करुन महाविकास आघाडीसाठी कंबर कसली आहे. याचाच एक भाग म्हणून जिल्हयातील ब्रिगेडच्या शिष्टमंडळाला शरद पवार यांनी भेट साठी बोलावले होते. या भेटीनंतर परकाळे म्हणाले की, आजच्या हुकूमशाहीला, दहशतीला पराभूत करण्यासाठी संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते घरोघर जाऊन संविधान वाचविण्यासाठी प्रचार करणार आहेत. भविष्यात महायुतीच्या कोणत्याही जुमल्यांना मतदारांनी बळी पडू नये ,असे आवाहन त्यांनी केले. सध्याचे सरकार खोके सरकार व जुमलेबाज सरकार असल्याची टिका देखील त्यांनी केली. आता खोटी आश्वासन नको. जिल्ह्यात व शहरात चांगले शिक्षण, आरोग्य, रस्ते, रोजगार, वीज सुविधा मिळाल्या पाहिजेत. शेतमालाला, दुधाला चांगला भाव मिळाला पाहिजे, देशाचे संविधान सध्या धोक्यात आले आहे यासाठी हुकूमशाहीला पराभूत करण्यासाठी संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा घरोघर जाऊन प्रचार करणार आहेत.

यावेळी महानगर कार्याध्यक्ष अच्युत गाडे, जिल्हा कर्याध्यक्ष शरद जोशी, जिल्हा महासचिव नीलेश बोरुडे, जिल्हा उपाध्यक्ष सचिन काकडे, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष शाम जरे, पारनेर तालुकाध्यक्ष सुदाम कोरडे, पाथर्डी तालुकाध्यक्ष डॉ. राहुल देशमुख, कर्जत तालुकाध्यक्ष दत्ता भोसले, शेवगाव तालुकाध्यक्ष लक्ष्मण गायके, श्रीगोंदा उपाध्यक्ष दिलीप लबडे, जिल्हा कार्याध्यक्ष राहुल भिंगारदिवे, श्रीगोंदा शहराध्यक्ष विनोद मेहत्रे, नगरतालुका कार्याध्यक्ष अवी मेढे उपस्थित होते.

**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.



# हनुमान चालिसा

**मंगल भक्त सेवा मंडळ**

शनिवार, दि.१३ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**नवरत्न तरुण मंडळ**
इ.ब.क. चौक, माळीवाडा,
**श्री. अविनाश घुले**

रविवार, दि.१४ एप्रिल २०२४
**कलावती सुर्यभान शेळके**
गणेश चौक, हडको कॉलनी, सावेडी रोड, **श्री. काका शेळके**

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडल**

शनिवार, दि. १३ एप्रिल २०२४
- स्थळ -
**सावेडी माहेश्वरी समाज**
श्री स्वामी समर्थ मंदिर,
हॉटेल ओबेरॉयच्या समोर
सावेडी,अहमदनगर

रविवार, दि.१४ एप्रिल २०२४
**अनिकेत, डॉ. प्राजक्ता,ध्रुवक झावरे**
एल.आय.सी.कॉलनी, प्रशांत बंगला,टिव्ही सेंटरजवळ, सावेडी

**श्री दक्षिण मुखी हनुमान सत्संग मंडळ**

शनिवार, दि. १३ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
- स्थळ -
**संघर्ष प्रतिष्ठान ट्रस्ट**
श्रमिक बालाजी मंदिर,
श्रमिकनगर, **संतोष येमूल**

रविवार, दि. १४ एप्रिल २०२४
**दीपक भागचंदानी (परिवार)**
चैतन्य नगर, प्रोफेसर कॉलनी,
जॉगिंग पार्क जवळ,
**दिपक भागचंदानी**

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट)**

शनिवार, दि. १३ एप्रिल २०२४
रात्रौ ८.३०
**सुनिल चेनसुखलालजी गुगळे**
**रजनीगंधा अपार्टमेंट मित्र मंडळ**
इंद्रप्रस्थ मंगल कार्यालयजवळ
महात्माफुले चौक, अहमदनगर

रविवार, दि. १४ एप्रिल २०२४
**जय श्री महाकाल ग्रुप**
युनियन बँक जवळ, पापय्या गल्ली,
चितळेरोड, **सुमित धेंड**

PDF Compressor Free Version



राजस्थान आणि पश्चिम बंगाल वेगवेगळ्या टोकांवर आहेत; परंतु दोन भिन्न राजकीय रेषा असणाऱ्या नेत्यांच्या भाषणातील समान धागा राममंदिराच्या मुद्याच्या अखंड भारत विस्ताराकडे निर्देश करतो. भाजपने पुन्हा एकदा संपूर्ण देशाला राममय करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. राम मंदिराच्या निमित्ताने भाजपला हवे तसे वातावरण तयार केले होतेच. आता अन्य पक्षही प्रचारात रामाचा मुद्दा वेगळ्या अर्थाने वापरताना दिसत आहेत.

# वाचाळणे ते व्यर्थ

राजकीय

**प्रा. अशोक ढगे**

भारतीय जनता पक्ष वर्षानुवर्षे लोकसभेच्या तसेच अन्य निवडणुकांमध्ये राम मंदिराच्या मुद्याचे भांडवल करत होता. आता राम मंदिर पूर्ण झाले आहे. राम मंदिरानंतर काशी, मथुरेसह अन्य मुद्दे हातात घेण्याचे जाहीर करत असताना राम मंदिराच्या मुद्याचे पूरेपुर श्रेयही भाजप घेणार यात कोणतीही शंका नव्हती. राम मंदिर पूर्ण झाल्याचा इव्हेंट देशभर मोठ्या धुमधडाक्यात संपन्न झाला. खरे तर राम मंदिर पूर्ण झाल्यानंतर रामराज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी काम करणे अपेक्षित होते; परंतु तसे झाले नाही. प्रभू श्रीराम व्यक्तीद्वेषी नव्हते. त्यांचा अपप्रवृतीला विरोध होता. एकवचनी, एकपत्नी अशा रामाचा आदर्श घेऊन वाटचाल करणे सोपे नाही. त्यातच आता जिंकण्यासाठी कोणत्याही थराला जाण्याचा काळ आहे. पराकोटीचा व्यक्तिद्वेष, हिंसा, भावना भडकावण्यास प्राधान्य या सगळ्या कुप्रवृत्ती राजकारणाचा भाग झाल्या आहेत. यापूर्वीही रामाच्या नावाखाली दंगे भडकावण्याचे राजकारण आपण पाहिले आहे. अजूनही ते सुरूच आहे.

विरोधक राम मंदिराच्या उद्घाटनाला न आल्यावरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजकारण सुरू केले. खरे तर राम हृदयात असावा लागतो, तो अयोध्येत गेल्यानंतरच भेटतो असे नव्हे. हनुमानाने नाही का राम हृदयात असल्याचे दाखवून दिले होते? रामभक्त आहे की नाही, हे 'जय श्रीराम'च्या घोषणा दिल्यावरून सिद्ध होत नसते. राम आचरणात आणावा लागतो. मुलाचे नाव राम ठेवले आणि तो गुन्हेगारीकडे वळला तर तो रामाचा दोष नसतो. 'नाव सोनुबाई आणि हाती कथलाचा वाळा' असे अनेकजणांबाबत होते. शिवाय देवाचे अवडंबर माजवण्यापेक्षा त्याच्या आदर्शाचे आचरण करणे केव्हाही चांगले असते. या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यात रामावरून सुरु झालेल्या कलगीतुऱ्याकडे पहावे लागेल. ममतादीदी राजकीय हितसंबंध लक्षात घेऊन रामाचे नाव घेत आहेत हे नक्की; पण निदान त्या हा मुद्दा चर्चेत तरी आणत आहेत. राम मंदिराच्या उभारणीचा उत्तर प्रदेशात सर्वाधिक राजकीय परिणाम होईल, असे आधीच मानले जात असून भाजपचे स्टार प्रचारक म्हणून योगी आदित्यनाथ यांनी देशभर जनजागृती सुरू केली आहे. आदित्यनाथ यांची राजस्थानमधील निवडणूक रॅली हे त्याचे ताजे उदाहरण म्हणावे लागेल. राम मंदिराच्या निमित्ताने आदित्यनाथ यांनी कॉंग्रेसवर निशाणा साधला आहे तर पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी भाजपवर रामाच्या नावाने दंगली भडकवल्याचा आरोप करत आहेत.

राजस्थान आणि पश्चिम बंगाल वेगवेगळ्या टोकांवर आहेत; परंतु दोन भिन्न राजकीय रेषा असणाऱ्या नेत्यांच्या भाषणातील समान दुवे राममंदिराच्या मुद्याच्या अखंड भारत विस्ताराकडे निर्देश करतात. भाजपने पुन्हा एकदा संपूर्ण देश राममय करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. या वर्षी २२ जानेवारीला अयोध्येत राम मंदिराच्या उद्घाटनाच्या निमित्ताने भाजपला हवे तसे वातावरण आधीच तयार झाले होते आणि जवळपास तशीच तयारी आता १७ एप्रिलच्या निमित्ताने केली जात आहे. राम मंदिर उभे राहिल्यानंतरची ही पहिली रामनवमी आहे. या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी अयोध्येला जाऊ शकतात. विशेष म्हणजे रामनवमीच्या दोन दिवसांनंतर म्हणजेच १९ एप्रिलला देशात लोकसभा निवडणुकांच्या पहिल्या टप्प्याचे मतदान होणार आहे. थोडक्यात, रामनवमी हा पहिल्या टप्प्यातील निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा दिवस असेल. असा योगायोग वारंवार येत नाही. योगायोग निर्माण झाला की प्रयोग करण्यात कुणी मागे का रहावे? आदित्यनाथ आणि ममता यांच्या प्रचारातील संदर्भ वेगळे आहेत पण मुद्दा एकच आहे... तो म्हणजे 'राम नाम' आणि दंगल...!

आदित्यनाथ यांनी राजस्थानमध्ये कॉंग्रेसवर निशाणा साधला आहे. तिथे भाजप आणि कॉंग्रेसमध्ये सरळ लढती आहेत. तशीच लढत पश्चिम बंगालमध्ये भाजप आणि तृणमूल कॉंग्रेसमध्ये आहे. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल कॉंग्रेससाठी भाजप हे सर्वात मोठे आव्हान आहे. ममता बॅनर्जी यांना कॉंग्रेसची पर्वा नाही. आदित्यनाथ म्हणत आहेत की कॉंग्रेस पक्ष ही देशासाठी मुख्य समस्या आहे. संचारबंदी लादणे त्याच्या 'डीएनए'मध्ये आहे. या पक्षाच्या कार्यप्रणालीचे वर्णन करताना आदित्यनाथ यांनी 'कर्फ्यू' हा शब्द वापरला आहे तर ममता बॅनर्जी दंगलींबद्दल बोलत आहेत. एकंदर प्रकरण तसेच आहे. दंगली होतात तेव्हाच कर्फ्यू लावला जातो. दोघांची वृत्ती आणि उद्दिष्ट एकच आहे. आदित्यनाथ आणि ममता दोघेही समान पद्धती अवलंबत असून दोघांकडूनही शत्रूला लक्ष्य केले जात आहे. मुद्दा असा आहे की दोन्ही ठिकाणी राम आणि दंगलींचा उघरवाने उल्लेख होत आहे. आदित्यनाथ राजस्थानमध्ये कॉंग्रेसवर टीका करताना कॉंग्रेस गरिबांना उपाशी मारेल, पण दहशतवाद्यांना बिर्याणी खायला देण्याची व्यवस्था करेल, असे म्हणत आहेत. हा उल्लेख पाकिस्तानी दहशतवादी कसाबबद्दल असल्याचे वेगळे सांगायला नको. २६/११ च्या हल्लेखोर कसाबने बिर्याणी खाण्याची इच्छा व्यक्त केल्याची बरीच चर्चा आपण ऐकली आहे. त्या वेळी देशात कॉंग्रेस आघाडीचे सरकार होते. वास्तविक, कसाबला त्यांच्याच काळातील सरकारने पकडले होते. तुरुंगात काय खायला द्यायचे, हे सरकार ठरवत नसते. तुरुंग न्यायालयाच्या अधीन असतात; परंतु राजकीय भांडवल करताना शत्रूराष्ट्राच्या नागरिकाचाही आधार घेण्याची वेळ येते, हे खरे दुर्दैव आहे.

सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी कसाबने कधीही बिर्याणी मागितली नव्हती किंवा ती त्याला दिली गेली नव्हती, असे स्पष्ट केले असताना आदित्यनाथ अजूनही अशी विधाने करून निकम यांच्या विधानांना छेद देत त्यांच्या देशभक्तीवरही शंका घेतात की काय, असा प्रश्न उपस्थित होतो. राम मंदिरावरून कॉंग्रेसवर निशाणा साधताना योगी म्हणतात की राम मंदिर बांधणे दूरच; परंतु कॉंग्रेसने भगवान राम आणि भगवान कृष्ण यांना काल्पनिकच मानले आहे. ममता निवडणूक रॅलीत रामाचे नाव घेतात; पण ते भाजपला साद देण्यासाठी.



राम मंदिर उद्घाटन सोहळ्यावर पहिल्यांदा बहिष्कार टाकणाऱ्या ममता म्हणतात की, भगवान राम तुम्हाला दंगल करायला सांगत नाहीत. पण हे लोक त्यांचे नाव घेऊन दंगल करतील. २०२१ च्या पश्चिम बंगाल निवडणुकीपूर्वीही ममतादीदी भाजपवर असेच आरोप करत होत्या. ममता बॅनर्जींचा आरोप आहे की, पश्चिम बंगालमध्ये दंगल घडवण्यासाठी भाजप इतर राज्यातून लोक आणतो. पण या वेळी ममता बॅनर्जी काही नवीन सांगत आहेत. 'एनआयए'च्या पथकाने पूर्व मिदनापूर येथे कारवाई केली, तेव्हा या पथकावर हल्ला झाला. मोदी यांनी त्याचे भांडवल केले. याचा संदर्भ देत ममता म्हणाल्या की, 'एनआयए' म्हणजेच राष्ट्रीय तपास यंत्रणा पाठवून भाजप दंगली घडवू शकतो.

ममता बॅनर्जी लोकांना इशारा देतात की १९ एप्रिलला मतदान आहे आणि १७ एप्रिलला ते दंगल घडवतील. भाजपला खडसावताना भगवान राम तुम्हाला दंगल करायला सांगत नाहीत, असे त्या बजावतात. सहा एप्रिल रोजी 'एनआयए'चे पथक २०२२ च्या बॉम्बस्फोट प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पूर्व मिदनापूरमधील भूपतीनगरमधील तृणमूल कॉंग्रेसच्या नेत्याच्या घरी पोहोचले. मनोब'ता जना आणि बालचंद्र मैती या दोन नेत्यांना तेव्हा अटक केली होती. तिथल्या लोकांनी 'एनआयए' अधिकाऱ्यांवर हल्ला केला. तपास यंत्रणेच्या गाडीवरही विटा फेकण्यात आल्या. 'एनआयए'च्या पथकावर हल्ल्याची ही दुसरी घटना आहे. 'एनआयए'च्या छाप्यामुळे ममता बॅनर्जी नाराज आहेत. निवडणुकीपूर्वी तपास यंत्रणेच्या कारवाईवर त्या प्रश्न उपस्थित करत आहे. मध्यरात्री छापा का, त्याला पोलिसांची परवानगी होती का, असे प्रश्न उपस्थित करत त्या हल्ल्यांचे समर्थन करत आहेत. ममता सांगत आहेत की तिथल्या लोकांनी प्रतिकिं या दिली तशीच या ठिकाणी कोणी अनोळखी व्यक्ती आली असती तर दिली असती. थोडक्यात, आता भाजपसोबतच विरोधी पक्षांनीही राम मंदिराला निवडणुकीचा मुद्दा बनवायला सुरुवात केली आहे का, हा प्रश्न पडल्याखेरीज राहत नाही. पश्चिम बंगालमध्ये हे सर्व केल्याचा फायदा ममता बॅनर्जींना मिळण्याची शक्यता आहे; पण इतर ठिकाणी भाजपलाच फायदा होईल हे मात्र नक्की.

---

**देश लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवाच्या साजरीकरणात मशगुल असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाचे पुण्यस्मरण अनेक बाबींकडे लक्ष वेधून घेणारे ठरेल. डॉ. आंबेडकरांनी नेहमीच अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांपासून, मानवी अधिकारांपासून दूर असणाऱ्या व्यक्ती, समूह वा समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा विचार मांडला. सद्यस्थितीत हा विचार बलवान होणे गरजेचे आहे.**

# मोलाचा विचार

विशेष

**प्रा. अर्जुन डांगळे**

देशभर सार्वत्रिक निवडणुकांचे वातावरण असताना आणि देश एका नव्या सरकारवर मोहर उमटवण्याचा विचार करत असताना साजऱ्या होणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काही महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा होणे गरजेचे आहे. सध्याच्या घटनाक्रमांच्या संदर्भात तर बाबासाहेब प्रकर्षाने आठवतात. लोकशाही हा केवळ शासनयंत्रणेचा भाग नसून लोकशाहीचे सामाजिकीकरण झाले पाहिजे, असा त्यांचा विचार होता. लोकशाही हा जीवनमार्ग आहे, असे त्यांचे मत होते. बाबासाहेबांनी असे अनेक आपले विचार स्पष्टपणे मांडले आहेत. सर्वसामान्य माणसाला अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांपासून, मानवी अधिकारांपासून दूर ठेवले असल्यास अशा व्यक्ती, समूह वा समाजाला मुख्य प्रवाहात आणले पाहिजे आणि त्यांना सर्व न्याय्य अधिकार मिळाले पाहिजे हे त्यांचे म्हणणे आजच्या काळात प्रामुख्याने लक्षात घेण्याजोगे आहेत.

आज आपण लोकशाहीचा संकोच होताना बघत आहोत. विशिष्ट वर्गाची मक्तेदारी वाढताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर बाबासाहेबांच्या 'एक माणूस, एक मूल्य' या तत्वावर निर्माण केलेल्या भारतीय संविधानाचा विचार



करणेही महत्त्वाचे आहे. त्यांचे विचार एका माणसासाठी, जातीसाठी वा समूहासाठी नव्हे तर भारतातील सगळ्या 'नाही रे' वर्गाला मूळ प्रवाहात सहभागी करुन घेण्याच्या बाजूचे होते. मानवी स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचा तो एक भाग होता, असेही आपण म्हणू शकतो. वर्ण, भेद, जात, लिंग अशा कोणत्याही बाबींवरुन कोणावर अन्याय होता कामा नये, असे ते म्हणायचे. म्हणूनच आपण त्यांना कोणा एका समुहाचे नेते नव्हे तर मानवमुक्तीच्या लढ्याचे नेते म्हणून ओळखतो. मात्र आता देशाचे हे संविधानच बदलण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे की काय, असे वाटते. एक 'मनुवादी फॅसिझम' नावाची गोष्ट येते की काय, अशी शंका व्यक्त झाल्यास वावगे वाटत नाही.

'क्रांती आणि प्रतिक्रांती' या नावाने लिहिलेला बाबासाहेबांचा एक निबंध प्रसिद्ध आहे. त्यात त्यांनी लिहिले होते की, समाजातील खालचा, नाकारले गेलेले वर्ग काही काळानंतर प्रगती करुन उन्नती साधू पाहतो तेव्हा सत्ता हाती असणारा प्रस्थापित वर्ग आपले हितसंबंध धोक्यात आल्यामुळे खालच्या वर्गाला दाबण्याचा प्रयत्न करत असतो. यातूनच प्रतिक्रांतीची सुरुवात होते. आज त्यांनी सांगितलेली प्रतिक्रांतीची परिस्थिती आली आहे की काय, असेही वाटून जाते. बाबासाहेबांनी कधीच कोणत्या विचारसरणीला विरोध केला नाही. महात्मा गांधींनीही कोणत्याही एका धर्मावर आधारित देश नको असे मत व्यक्त करताना, मला हिंदू भारत नको आहे... असे म्हटले होते. पाकिस्तान धर्माच्या आधारे निर्माण झाला तसे इथे होऊ नये, हे मत समजून घेण्याजोगे आहे.

महामानवांच्या अशा सम्यक मतांमुळे देशाची लोकशाही इतका प्रदीर्घ काळ टिकली आहे. भाषा, धर्म, पंथ यासारख्या अनेकांमध्ये विविधता असतानाही लोकशाही टिकली आणि देशही टिकला याचे श्रेय या महात्म्यांना द्यायलाच हवे. देशात स्थैर्य असेल तरच प्रगती होते. सगळीकडे अराजक असेल, जातीपातींमध्ये तंटे-भांडणे असतील तर कोणत्याही देशाची प्रगती होणे शक्य नाही. त्यामुळे सर्व प्रकारचे स्थैर्य प्रस्थापित होण्यासाठी बाबासाहेबांचे एक वाक्य नेहमी लक्षात ठेवायला हवे. 'मी प्रथम भारतीय आहे आणि अंतिमतःही भारतीयच आहे' अशी भावना व्यक्त करणारा त्यांचा विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. ही जाणीव वाढवणे हीच बाबासाहेबांना जयंतीदिनानिमित्त वाहिलेली योग्य भावनांजली ठरेल. अर्थातच ही जाणीव संविधानामुळे निर्माण होते. म्हणूनच संविधानाने सांगितलेल्या मूल्यांच्या जतनाकडे आणि पालनाकडे लक्ष देणे ही सध्याच्या काळाची गरज आहे. प्रत्येक भारतीयाने प्रशासनात, सार्वजनिक जीवनात याचे भान राखले गरजेचे आहेच त्याचबरोबरच संविधानाचे जतन ही सरकारचीही जबाबदारी आहे. आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने हा विचारही व्हायला हवा.

विचारात घेण्याजोगी आणखी एक बाब म्हणजे देशात अलिकडच्या काळात धर्मांचे आणि जातींचे प्राबल्य वाढत चालले असून ही लोकशाहीच्या दृष्टीने विचारात घेण्याजोगी बाब आहे. खरे तर या लोकशाही देशात धर्म हा राजकारणाचा अविभाज्य भाग होता कामा नये. परंतु आज धर्म तसेच जातींच्या राजकारणावर भर दिला जात आहे. मग देशात सर्वधर्मसम्भावाची शिकवण कशी रूजवली जाणार, हा खरा प्रश्न आहे. त्यादृष्टीने सर्व स्तरातील लोकांनी विचार करण्याची आवश्यकता आहे. किंवा हा वैचारिक घुसळणीचा भाग ठरायला हवा. या देशातील साऱ्यांना शिक्षण मिळाले पाहिजे. त्यापासून कोणी वंचित राहता कामा नये, असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आग्रह होता. परंतु आजची स्थिती विचारात घेतली तर शिक्षण वरचेवर महाग होत चालले आहे. त्यामुळे ते विशिष्ट वर्गापुरतेच मर्यादित राहते की काय, अशी शंका वाटत आहे. सरकारी शाळांबाबत अनास्था आणि दुसरीकडे खासगी शाळांना प्रोत्साहन यामुळे सरकारी शाळा अडचणीत आल्या आहेत. खासगी शाळांमधील शिक्षण सामान्य तसेच गरिबांच्या आवाक्यातील राहिलेले नाही. अशा स्थितीत शाळाबाह्य मुलांची संख्या वाढणे साहजिक आहे. बेरोजगारीचा प्रश्नही ऐरणीवर आहे. म्हणजे सामान्य, गरिबांच्या मुलांना शिक्षण घेणे कठीण होत असताना दुसरीकडे शिकलेल्यांच्या हाताला काम नाही. त्यामुळे आता केवळ उच्च शिक्षणावर भर देऊन भागणार नाही तर या उच्च शिक्षितांच्या रोजगाराची व्यवस्था होणेही गरजेचे आहे. आज जग वेगाने बदलते आहे. ग्लोबलायझेशनचा जमाना आहे. यात आधुनिक विचार, आधुनिक दृष्टीकोन या बाबी गरजेचा ठरत आहेत. असे असताना प्रत्यक्षात जाती, धर्मावर भर देत देश जुन्या विचारांकडे झुकत चालल्याचे पहायला मिळणे क्लेषकारक आहे.

आज देशात जातीय, धार्मिक अस्मिता अधिक घट्ट होऊ लागल्या आहेत. एखाद्या गोष्टीचा फायदा आपल्या जातीबांधवांना वा धर्मबांधवांनाच व्हावा असा आग्रह धरला जात असून त्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबण्याचे नाव घेत नाहीत, उलट अशा घटनांमध्ये वाढ होत आहे. महागाई वाढत जाईल तसे सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन, महागाई भत्ता हे सारे वाढत जाते. मात्र, महागाई वाढूनही शेतमजुरांच्या वेतनात म्हणावी तशी वाढ होत नाही. असंघटित कामगारांबाबत हेच चित्र पहायला मिळते. यातून निर्माण होणारी आर्थिक विषमता चिंताजनक आहे. ही आर्थिक विषमता देशाच्या विकासातही अडसर ठरते, हे लक्षात घ्यायला हवे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 'आता आपण विसंगत जगात प्रवेश करत आहोत' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. त्याचे प्रत्यंतर आताही पहायला मिळत आहे. आधी उल्लेख केल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतीक्षेत्राबाबत सांगितलेले वास्तवही अद्याप कायम आहे. 'शेतकरी वर्षातील चार महिने बेरोजगार असतो. हे लक्षात घेऊन त्यांच्यासाठी पूरक उद्योग निर्माण होण्याची आवश्यकता आहे' असे डॉ. आंबेडकर सांगत. परंतु त्याकडे तेव्हापासून आजतागायत म्हणावे तसे लक्ष देण्यात आले नाही. आजही अनेक तज्ज्ञ शेतीला पूरक उद्योग निर्माण करण्यावर भर द्यावा, असा आग्रह धरत आहेत. यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टीची कल्पना येते. देशातील गरिबी, दारिद्र्य कमी करण्याचे आव्हान आजही कायम आहे. किंबहुना, दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढत आहे. अशा परिस्थितीत दारिद्र्य निर्मूलनाचा कालबध्द कार्यक्रम हाती घेणे आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी गरजेची आहे. दारिद्र्य, बेकारी, गरिबी याविरूध्दचा लढा हे सुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे मुख्य सूत्र होते. इंदिरा गांधी यांनी पंतप्रधानपदी असताना बँकांचे राष्ट्रीयीकरण केले आणि देशातील सावकारी रद्द केली. याचा सामान्य जनतेला फायदा झाला. तसा काही कार्यक्रम आता राबवला जाण्याची आवश्यकता आहे. आर्थिक विकासाचे सर्व नियम घटनेत असावेत, असा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आग्रह होता. परंतु तो त्यावेळी मान्य करण्यात आला नाही. त्यामुळे आजही देशाच्या आर्थिक विकासाचे धोरण कसे आहे, ते कोणाच्या बाजूने आहे, असे प्रश्न पडल्याशिवाय राहत नाहीत. त्याच बरोबर सर्वंकष आर्थिक विकासाचे धोरण कधी प्रत्यक्षात येणार आणि त्याचे अपेक्षित परिणाम कधी दिसून येणार, हाही विचारात घेण्याजोगा भाग आहे. या सर्व प्रश्नांची नेमकी उत्तरे उत्तरे मिळवण्यासाठी बाबासाहेबांच्या विचारांवर विचार करण्याखेरीज पर्याय नाही.

---

# जडणघडण मर्यादा पुरुषोत्तमाची!

**रामायणातील राजस्त्रियांच्या आयुष्यात अनेकदा युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली. पण ती राजमहालाच्या चार भिंतीत. फसवणूक, उपेक्षा, विश्वासघात, वासनांधता अशा किती तरी लढ्यांना त्यांनी तोंड दिले. त्यांची झुंज ही कधी आप्तांशी तर कधी स्वतःशीच झाली. या युद्धात संयम, धैर्य, निष्ठा, पातिव्रत्य, विवेक, राजधर्म, कुलधर्म ही शस्त्रे वापरुन त्या विजयी झाल्या आहेत. हा आजच्या काळासाठी एक महत्त्वाचा संदेश आहे.**

प्रासंगिक

**डॉ. साधना कुलकर्णी**

सध्या प्रभू श्रीरामाचे नवरात्र सुरू आहे. जो तो आपल्या परीने श्रीरामाची उपासना करत आहे. या वर्षीच्या रामनवमीला अयोध्येतील श्रीरामाच्या प्राणप्रतिष्ठेची पार्श्वभूमी लाभली आहे. त्यामुळे या रामजन्मोत्सवाला ऊर्जा, भक्ती, पूजन यांचा परमोच्च आविष्कार समाजात दिसून येईल, यात शंका नाही. प्रभू श्रीरामाला भारतीय जनमानसात अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याची प्रचिती अयोध्येच्या प्राणप्रतिष्ठेच्या प्रसंगी आली आहेच. रामायण या महाकाव्याची निर्मिती त्रेतायुगात झाली. त्यानंतर द्वापार युग सुरू झाले आणि आता आपण कलियुगात आहोत. पण आजही रामायणाचे गारुड तसेच आहे, किंबहुना ते वाढताना दिसत आहे. याचे काय कारण असावे? भारतीय संस्कृतीची मशागत होण्यामध्ये रामायणाचा सिंहाचा वाटा आहे. दुसरे असे की ही विजय गाथा आहे. धर्माचा अधर्मावर, सद्गुणाचा दुर्गुणावर, सन्नितीचा अनितीवर विजय रामायणात आहेच पण तो केवळ शस्त्रसामर्थ्याने नाही तर श्रेष्ठ सदाचरणाने प्राप्त झाला आहे. त्यामुळे युगानुयुगे रामायणातून सदाचरणाची प्रेरणा मिळत आली आहे. तिसरे कारण म्हणजे रामायणातील पात्रांनी आदर्शांचे मापदंड प्रस्थापित केले आहेत. हे आदर्श आणि सिद्धांत काळाच्या प्रत्येक लाटेच्या कसोटीवर खरे उतरले आहेत. त्यामुळे आजही राम कथा कालसुसंगत आहे. चवथे कारण म्हणजे रामराज्य हे मूल्यांचे राज्य आहे. कर्तव्याच्या तुलनेत वैयक्तिक मोह, भावना, प्रेम यांना महत्त्व न देता, केवळ प्रजाहिताला या राज्यात प्राधान्य दिले आहे. आजच्या काळात अशा रामराज्याच्या स्मरणानेही समाजाला आत्मिक समाधान लाभते. पाचवे कारण म्हणजे प्रभू श्रीराम ही एक व्यक्ती किंवा ईश्वर नाही. तर राम ही वृत्ती आहे, विचार आहे, आचरण आहे; एवढेच नाही तर राम हे तत्व आहे. असा हा राम प्रत्येकाच्या हृदयात असतो. रामकथेत तो 'आत्माराम' जागृत करण्याची शक्ती आहे. त्यामुळे रामायण हे भारतीयांच्या रक्त मांसपेशीत रुजले आहे आणि पिढी-दर पिढी ते त्याच उत्कटतेने झिरपते आहे. आचार्य विनोबा भावे म्हणतात, 'माझा राम आधी विश्वनंदन आहे आणि मागाहून दशरथनंदन आहे.

(पान ५ वर)

PDF Compressor Free Version

# समाचार म साहित्य मैफल

# पृथ्वीचे फिरणे थांबले तर...?

**पृथ्वीचे वाढते तापमान किती धोकादायक ठरू शकते, हे या ना त्या स्वरुपात आपल्यापर्यंत पोहोचले आहे. सध्याची स्थिती ही भीती वा दहशत वाढवणारी आहे. मात्र वाढत्या तापमानामुळे आगामी काळात मोठ्या समस्या निर्माण होऊ शकतात. वातावरणातील बदलामुळे पृथ्वीच्या फिरण्याच्या गतीवर परिणाम होत आहे. त्यामुळेच भविष्यात जागतिक घडाळयांची वेळ ठरवताना काही बदलही होताना दिसू शकतात.**

पृथ्वीचे वाढते तापमान हा जागतिक पातळीवरील चिंतेचा विषय असून प्रत्येक देश कोणत्या ना कोणत्या प्रकारे याचे परिणाम भोगत आहे. वाढत्या तापमानाच्या परिणामस्वरुप ग्रीनलँड आणि अंटार्क्टिकामध्ये बर्फ वेगाने वितळत आहे. परिणामी, समुद्राची पातळी दिवसेंदिवस वाढत आहे. बर्फ वितळल्यामुळे आणि पाण्याच्या पातळीत वाढ झाल्यामुळे पृथ्वीच्या फिरण्याचा वेग थोडा कमी होत आहे. 'नेचर' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात म्हटले आहे की जागतिक तापमानवाढीमुळे आधीच जागतिक टाइमकिपिंगवर परिणाम होत आहे. 'कोऑर्डिनेटेड युनिव्हर्सल टाइम' (यूटीसी) चा वापर जगभरातील घड्याळांची वेळ ठरवण्यासाठी केला जातो. 'यूटीसी' पृथ्वीच्या फिरण्याच्या गतीवर ठरवली जाते. अर्थातच पृथ्वीच्या परिभ्रमणाचा वेग स्थिर नाही. त्यामुळे त्याचा थेट परिणाम आपल्या दिवस आणि रात्रीच्या लांबीवर होऊ शकतो. पृथ्वीच्या परिभ्रणाचा वेग मंदावला तर दिवस मोठा होऊ शकतो.

'ग्लोबल टाइमकीपर्स'नी १९७० पासून जागतिक घड्याळात २७ लीप सेकंद जोडले आहेत. तथापि, आता प्रथमच टाइमकीपर्स २०२६ मध्ये जागतिक घड्याळ एका सेकंदाने कमी करण्याचा विचार करत आहेत. या घटनेला 'निगेटिव्ह लीप सेकंड' म्हणतात. तज्ज्ञांच्या मते, आजपर्यंत 'निगेटिव्ह लीप सेकंड'चा वापर कधीही झालेला नाही. धोक्याची बाब म्हणजे त्याचा वापर जगभरातील संगणक प्रणालींसाठी अभूतपूर्व समस्या निर्माण करेल. यासंबंधी बोलताना कॅलिफोर्निया विद्यापीठातील संशोधक डंकन ऍग्न्यू म्हणतात, 'याआधी कधीच असे घडले नव्हते. जागतिक 'टायमिंग इन्फ्रास्ट्रक्चर'चे सर्व भाग जगभरात समान वेळ दाखवतात की नाही याची खात्री करणे हे एक मोठे आव्हान आहे. वर उल्लेख केलेली घटना घडल्यास त्यांचे कोडिंग नव्याने करावे लागेल.'

आधी उल्लेख केल्याप्रमाणे जगातील वाढत्या तापमानाचा थेट परिणाम ग्रीनलँड आणि अंटार्क्टिकावर तीव्रतेने होत आहे. याबाबतचा नुकताच प्रसिद्ध झालेला अभ्यास धक्कादायक आहे. पृथ्वीच्या फिरण्याच्या गतीवर याचा परिणाम होणे ही अत्यंत चिंतेची बाब समजली जात आहे. संशोधक डंकन ऍग्न्यू म्हणतात त्याप्रमाणे पृथ्वी नेहमी एकाच वेगाने फिरत नसल्यामुळे 'युनिव्हर्सल टाईम'वर परिणाम दिसून येतो. तसे पाहिले तर १९७२ पासून जगभर वेळोवेळी लीप सेकंद जोडण्याची गरज भासू लागली आहे. याचे कारण संगणकीय आणि वित्तीय बाजारपेठेतील नेटवर्कशी संबंधित व्यवहारांमध्ये अचूक वेळेची आवश्यकता असते. पृथ्वीच्या परिभ्रमणातील नुकसानाची भरपाई करण्यासाठी आणि 'यूटीसी'ला सौर वेळेसह संकलित ठेवण्यासाठी एक मध्यांतर सेकंद जोडला जातो. अमेरिकेच्या कॅलिफोर्निया विद्यापीठातील संशोधक डंकन ऍग्न्यू यांचे हे संशोधन सध्या जागतिक पातळीवर चर्चेचा विषय बनले आहे.

पर्यावरण

**मिलिंद बेंडाळे**

पर्यावरण अभ्यासक

अर्थात पृथ्वीच्या फिरण्याचा वेग वाढला तरी २०२९ पर्यंत लीप सेकंद कमी करण्याची गरज भासणार नाही, असेही काही तज्ज्ञ सांगतात. मात्र बर्फाचे वितळणे असेच सुरू राहिल्यास परिस्थिती बिकट होईल, यात शंका नाही. 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे केवळ अंटार्क्टिकाचा बर्फ वितळत नाही, तर हा धोका अन्य अनेक ठिकाणी जाणवत आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की बर्फ इतक्या वेगाने वितळत असल्यामुळे समुद्रातील पाण्याचा प्रवाह कमी होताना दिसत आहे. स्थिती अशीच राहिल्यास जगभरातील जलस्रोतांमध्ये ऑक्सिजनची कमतरता भासेल. 'नेचर' जर्नलमध्ये प्रकाशित एका संशोधनात म्हटले आहे की, बर्फ जास्त वितळला तर अंटार्क्टिकाचे पाणी कमी खारट आणि अधिक तरल होईल. यामुळे खोल समुद्रातील प्रवाह कमी होईल. समुद्रातील प्रवाह कमी झाल्यास चार हजार मीटरपेक्षा खोल भागात पाण्याचा प्रवाह थांबेल आणि दलदलीसारखी परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे सागरी जीवनावर अत्यंत विपरीत परिणाम होणार आहे. पाण्यातील ऑक्सिजन कमी झाल्यामुळे पोषक तत्वांची कमतरता भासते. परिणामी, पाण्यातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढेल. हे सगळे लक्षात घेता सध्या जगभर एक प्रकारची सतर्कतेची स्थिती आहे, असे म्हणावे लागेल.

जागतिक तापमानवाढीच्या वाढत्या नकारात्मक परिणामांबद्दल जगभरातील शास्त्रज्ञांनी आधीच चिंता व्यक्त केली आहे. याबाबत अभ्यास करणारे संशोधक ऍग्न्यू हे कॅलिफोर्निया विद्यापीठातील 'स्क्रिप्स इन्स्टिट्यूशन ऑफ ओशनोग्राफी' येथे भूभौतिकशास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. ग्लोबल वॉर्मिंग आणि ग्लोबल टाइम यांचा अतूट संबंध आणि त्याचे भविष्यातील परिणाम हा त्यांच्या अभ्यासाचा विषय आहे. पृथ्वी दर २३ तास ५६ मिनिटे आणि चार सेकंदांनी सूर्याभोवतीची एक प्रदक्षिणा पूर्ण करते. तिचा फिरण्याचा वेग ताशी १,६७४ किलोमीटर इतका आहे. हा वेग एखाद्या लढाऊ विमानाएवढा आहे; पण पृथ्वीचा आकार एवढा मोठा आहे की आपण हे परिभ्रमण अनुभवू वा शोधू शकत नाही. अर्थात अंतराळ स्थानके किंवा उपग्रहांद्वारे पृथ्वीचे परिभ्रमण पाहिले जाऊ शकते. असे असताना कोणत्याही विपरीत परिस्थितीच्या परिणामस्वरुप पृथ्वीचे फिरणे थांबले तर दृश्य किती भयानक असेल याचा विचार करणेही अशक्य आहे. हे सर्व अचानक घडले तर जगाला मोठा धक्का बसेल. पृथ्वीचे फिरणे कायमचे थांबले तर पृथ्वीच्या एका भागात दिवस आणि दुसऱ्या भागात रात्र असेल. यामुळे एका भागाचे तापमान वाढेल आणि दुसऱ्या भागात थंडी वाढेल. याचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र संपेल. यामुळे अंतराळातून येणारे रेडिएशन थेट पृथ्वीवर पोहोचेल. सहाजिकच जगभरात अनेक आजार पसरु लागतील.



तंत्रज्ञानामुळे वेगाने विकसित होत असणाऱ्या आजच्या जगात कार्बन उत्सर्जन मानवी अस्तित्वासाठी सततचा धोका बनत आहे. त्याचे वैशिष्ट्य संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालातही समोर आले आहे. त्यात २०१४ ते २०२३ दरम्यानचा काळ सर्वात उष्ण दशक असल्याचा दावा करण्यात आला आहे. मध्यंतरीच संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक हवामान संघटनेने (डबल्यूएमओ) आपला वार्षिक हवामान स्थिती अहवाल प्रसिद्ध केला. आकडेवारीचा हवाला देत त्यात म्हटले आहे की २०२३ हे आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष होते. २०१४ ते २०२३ हा काळ सर्वात उष्ण दशक म्हणून नोंदवला गेला आहे. या दहा वर्षांमध्ये महासागरांवर उष्णतेच्या लाटांचा परिणाम झाला. जागतिक हवामान संघटनेच्या अहवालावर संयुक्त राष्ट्र प्रमुख अँटोनियो गुटेरेस यांनी चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, या अहवालावरून आपली पृथ्वी नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे दिसून येते. आपला ग्रह संकटाची चिन्हे दाखवत आहे. जीवाश्म इंधन प्रदूषण चार्ट हवामानातील बदलाने सजीवांचे किती नुकसान होत आहे, हे दर्शवतो. पृथ्वीवर किती वेगाने बदल होत आहेत याचा हा इशारा आहे. एक प्रकारे हा अहवाल जगासाठी 'रेड अलर्ट' आहे. उष्णतेचे रेकॉर्ड पुन्हा एकदा मोडले गेले तर परिस्थिती हाताबाहेर जाण्यास फारसा वेळ लागणार नाही.

वाढत्या तापमानाने विशेषतः महासागरांमध्ये उष्णतेच्या लाटा वाढल्या आहेत. हिमनद्या वितळल्या आणि मागे सरकल्या आहेत. अंटार्क्टिक महासागराच्या बर्फाचे पाणी चिंतेचा विषय ठरत आहे. १९५० मध्ये नोंदी सुरू झाल्यापासून जगभरातील प्रमुख हिमनद्यांमधील बर्फाचे सर्वाधिक नुकसान झाले आहे, हे दिसते. विशेषतः पश्चिम उत्तर अमेरिका आणि युरोपमध्ये परिस्थिती अधिक बिघडली आहे. एल निनोचा प्रभाव २०२३-२४ मध्ये सर्वोच्च स्तरावर पोहोचला आहे. येत्या काही महिन्यांमध्ये जागतिक हवामानावर याचा परिणाम होताना दिसेल. मार्च ते मे दरम्यान जवळजवळ सर्व भूभागांमध्ये तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता व्यक्त केली होती. सध्याची स्थिती या अपेक्षेच्या जवळ जाणारी आहे. सध्या 'एल निनो'च्या प्रभावामुळे जगभरात विक्रमी तापमान अनुभवायला मिळत असून अनेक गंभीर घटना बघायला मिळत आहेत.

# पंजाबमध्ये 'आप' मस्त; इतर पक्ष अस्वस्थ

पंजाबमध्ये भाजप आणि शिरोमणी अकाली दलाची युती तुटली, तेव्हा कॉंग्रेसचे नेते हसत होते. भाजप त्यांच्या बालेकिल्ल्यात घुसून स्वबळावर निवडणूक लढवण्याची घोषणा करेल याची त्यांना कल्पना नव्हती. भारतीय जनता पक्ष आतापर्यंत शिरोमणी अकाली दलाचा 'छोटा भाऊ' म्हणूनच वावरला; परंतु महाराष्ट्रात शिवसेनेला मोठा भाऊ करत करत त्याचे कधी पंख छाटले, हे कळले नाही तसेच भाजप पंजाबमध्येही करत आहे. शिरोमणी अकाली दलाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून भाजपशी युती तोडली. या वेळी दोघांमध्ये पुन्हा एकदा युती होण्याचे अंदाज होते; परंतु हे चित्र प्रत्यक्षात दिसले नाही. आता तर भाजपने ही निवडणूक स्वबळावर लढवण्याचे ठरवले असून कॉंग्रेस, शिरोमणी अकाली दल आणि 'आप'च्याही काही आमदार, खासदारांना आपल्या गोटात आणले आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये पंजाबने जनमत ३६० अंशांमध्ये बदलताना पाहिले आहे. या राज्यात पाय रोवून उभी असलेली कॉंग्रेस बघता बघता लयाला गेली. कॉंग्रेसमधील ही साठमारी बघत बसण्यापेक्षा जनतेने 'आप'ला पसंती दिली आणि कॉंग्रेसचा सफाया करत या पक्षाला सत्तेवर आणले. दरम्यान, भाजपने अकाली दलाची साथ सोडली आणि कॉंग्रेसजनांना सामावून घेत राज्यात आपली पाळेमुळे रुजवायला सुरुवात केली.



**पंजाबमध्ये लोकसभेच्या निवडणुका चौरंगी होत आहेत. विशेष म्हणजे देशभर 'इंडिया' आघाडीचे घटक पक्ष असणारे कॉंग्रेस आणि 'आप' हे पक्षही मैत्रीपूर्ण लढती करत आहेत. भाजप आणि शिरोमणी अकाली दल यांच्यात युती होता होता राहिली. त्यामुळे हे दोन पक्षही परस्परांविरोधात लढत आहेत. 'आप'चे संयोजक अरविंद केजरीवाल अटकेत असले, तरी त्यांच्या अटकेचा पंजाबमध्ये फारसा परिणाम होणार नसल्याचे दिसते.**

या लोकसभा निवडणुकीत भाजप ३७० आणि 'एनडीए' चारशेचा आकडा पार करण्याच्या आशेने निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपने गुरुदासपूर आणि होशियारपूर या दोन लोकसभा जागा जिंकल्या होत्या. या वेळी येथे अधिकाधिक जागा जिंकण्याचे पक्षाचे लक्ष्य आहे. अलीकडेच भारतीय जनता पक्षाने कॉंग्रेसचे तीन वेळा खासदार राहिलेल्या रवनीत सिंह बिट्टू यांना पक्षात सामावून घेतले आहे. भाजपने त्यांना लुधियानामधून उमेदवारी दिली आहे. या जागेसंदर्भात पक्षाची नजर तेथील ६६ टक्के हिंदू मतदारांवर आहे. तिथे भाजप राम मंदिराच्या उभारणीचे भांडवल करण्याचा प्रयत्न करू शकतो. पटियाला लोकसभा मतदारसंघ हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला आहे. या जागेवर कॉंग्रेसचे उमेदवार नऊ वेळा विजयी झाले आहेत तर अकाली दलाने ही जागा तीन वेळा आणि 'आम आदमी पक्षा'ने एकदा जिंकली आहे. या जागेवर भाजपने माजी मुख्यमंत्री अमरिंदर सिंग यांच्या पत्नी प्रणीत कौर यांना उमेदवारी दिली आहे. भाजपला आशा आहे की यामुळे कॉंग्रेसची मते आपल्या पक्षाकडे हस्तांतरित होतील आणि आम आदमी पक्ष आणि कॉंग्रेस यांच्यातील परस्परातील लढाईचा फायदाही होईल. फेब्रुवारी २०२३ मध्ये कौर यांना भाजपशी 'मिलीभगत' केल्याच्या आरोपावरून पक्षातून काढून टाकले होते. कॉंग्रेसने येथे धरमवीर गांधी यांना उमेदवारी दिली आहे.

राज्यरंग

**राही भिडे**

ज्येष्ठ पत्रकार

जालंधर मतदारसंघातून 'आप'चे खासदार सुशील रिंकू आणि जालंधर पश्चिमच्या आमदार शीतल अंगुराल यांना पक्षात सामील करून भाजपने सत्ताधारी 'आप'ला गोत्यात आणले आहे. भाजपने रिंकू यांना जालंधर मतदारसंघातून लोकसभेचे उमेदवार म्हणून उभे केले आहे. यंदा फरिदकोटमध्ये तिरंगी लढत पहायला मिळणार आहे. भाजपने प्रसिद्ध पंजाबी गायक आणि उत्तर पश्चिम दिल्लीचे विद्यमान खासदार हंस राज हंस यांना उमेदवारी दिली आहे. आम आदमी पक्षाने गायक आणि कॉमेडियन करमजीत अन्मोल यांना उमेदवारी दिली आहे तर कॉंग्रेसने प्रसिद्ध पंजाबी लोक गायक मोहम्मद सादिक यांना या जागेवरून उमेदवारी दिली आहे. गुरुदासपूर मतदारसंघातून सनी देओलच्या जागी पक्षाने तीन वेळा आमदार राहिलेल्या दिनेशसिंह बब्बू यांना उमेदवारी दिली आहे. पंजाबमधील लोकसभेच्या तेरापैकी सहा जागांवर भाजपने आपले उमेदवार जाहीर केले आहेत तर कॉंग्रेसने आपले सर्व उमेदवार जाहीर केले असून आम आदमी पक्षाने आठ उमेदवार उभे केले आहेत.

पंजाब हा कधीच भारतीय जनता पक्षाचा बालेकिल्ला नव्हता. लोकसभेत किंवा विधानसभेत पक्षाला मिळालेले यशही त्याचा दीर्घकाळचा मित्र असणाऱ्या शिरोमणी अकाली दलामुळेच होते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे अकालींशी युती करताना भाजप लहान भावाची भूमिका बजावत असे; मात्र शेतकरी आंदोलनाच्या मुद्द्यावरून अकाली दलाने भाजपशी संबंध तोडले होते. आगामी काळात अनेक नेते पक्ष बदलून भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. 'आम आदमी पक्षाचे नेते आणि दिल्ली सरकारचे मंत्री सौरभ भारद्वाज यांनी भाजपवर पंजाबमध्ये 'ऑपरेशन लोटस' चालवल्याचा आरोप केला आहे. जालंधर लोकसभा पोटनिवडणुकीच्या वेळी रिंकू यांनी कॉंग्रेस सोडून 'आप'मध्ये प्रवेश केला होता. त्यांनी सभागृहात भाजपवर टीकाही केली होती आणि गदारोळामुळे त्यांना सभागृहातून निलंबितही करण्यात आले होते.

असे सगळे असताना पंजाबमध्ये भाजपचा राजकीय पाया भक्कम नसताना इतक्या लोकांना पक्षात सामील करून घेऊन जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असल्याचा दावा करणाऱ्या भाजपला काय फायदा होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. भाजपला राजकीय मैदान तयार करायचे आहे. कॉंग्रेस आणि 'आप' सोडून भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्या बहुतेक नव्या लोकांना लोकसभा निवडणुकीसाठी तिकीट मिळणार असल्याचे समजते. पंजाबमध्ये भाजपची राजकीय स्थिती कनिष्ठ भागीदार अशी होती. त्यामुळेच भाजपला आजतागायत मजबूत राजकीय जनाधार निर्माण करता आला नाही. विधानसभेच्या ११७ जागांवर लढताना भाजपा आपली स्थिती काय असू शकते याचा आढावा घेऊ शकतो; मात्र विधानसभा निवडणुकीला अजून बराच अवधी आहे. राहुल गांधींच्या जवळच्या लोकांपैकी एक मानले जाणारे रवनीत सिंग बिट्टू हे पंजाब युवक कॉंग्रेसचे प्रमुख राहिले असून त्यांनी पक्ष सोडणे हा कॉंग्रेससाठी मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. सध्या पंजाब भाजपमध्ये कॉंग्रेसचे माजी नेते प्रभावशाली वाटतात. पंजाब भाजपचे अध्यक्ष सुनील जाखड हे कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष होते. राज्य विधानसभेतील विरोधी पक्षनेते प्रतापसिंग बाजवा यांचे भाऊ फतेह जंग बाजवा, माजी मंत्री राजकुमार वेरका, राणा गुरमीत सिंग सोढी, केवल सिंग ढिल्लन आणि इतर अनेक कॉंग्रेस नेते आता भाजपसोबत आहेत.

पंजाबमध्ये शीखांची संख्या सर्वाधिक आहे; परंतु ३८ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या हिंदू असून त्यात दलित आणि मागास जातींचाही समावेश आहे. या सगळ्यामध्ये भाजपने उत्तर प्रदेशमध्ये 'सोशल इंजिनिअरींग' करण्याचा प्रयत्न केला. त्याच प्रकारची संधी हा पक्ष इथेही शोधत आहे. पंजाबमधील लुधियानासारख्याजागांवर हिंदू मतदारांची संख्या ६५ टक्क्यांहून अधिक असल्याचे सांगितले जाते. ही जागा कॉंग्रेसचा बालेकिल्ला आहे. मात्र राम मंदिराची उभारणी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिष्मा या मुद्द्यांवरून हिंदू मतदार आपल्याकडे झुकू शकतात, असे भाजपला वाटते. करतारपूर कॉरिडॉर उघडण्यासारख्यागोष्टींची आठवण करून देऊन भाजपाचे नेते शीखांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचा फायदा भाजपची मतपेढी विस्तारण्यात होणार आहे. मात्र हे नेमके कधी घडेल, हे सांगता येत नाही.


(पान ४ वरून)

# जडणघडण मर्यादा पुरुषोत्तमाची!

रामायणातील सगळी पात्रे आपल्याला खूप जवळची वाटतात. यातील राजस्त्रियांच्या चरित्रात डोकावून बघितले तर स्त्रीशक्तीची असामान्य रूपे आपल्याला स्तिमित करतात. मातृशक्ती, त्याग, समर्पण, निष्ठा, संयम इत्यादी गुणांचा उत्तुंग आविष्कार म्हणजे रामायणातील स्त्रिया. रघुकुलातील राजांनी आपल्या शस्त्रसामर्थ्याने रणभूमीवर विजय मिळवला. त्याच वेळी या राजस्त्रियांनाही अनेक लढ्यांना सामोरे जावे लागले; तेही राजमहालाच्या चार भिंतीत आणि शस्त्रांशिवाय. कुणी वासनांध वृत्तीशी, कुणी विश्वासघाताशी, कुणी संशयपिशाच्चाशी, कुणी उपेक्षेशी तर कुणी नियतीच्या अगम्य खेळीशी लढा दिला आहे. ही लढाई त्यांना कधी आप्तस्वकीयांशी तर कधी स्वतःशीही करावी लागली आहे. या युद्धात धैर्य, संयम, विवेक, मर्यादा, पातिव्रत्य, श्रद्धा या शस्त्रांद्वारे त्यांनी यश मिळवले आहे. या विजयाची नोंद घेणे अत्यंत गरजेचे आहे. कारण रामायणाची उत्तुंगता या राजस्त्रियांमुळे कमालीची उंचावली आहे. वास्तविक, या प्रत्येक राजस्त्रीच्या ललाटावर नियतीने एका अटळ व्यथेचा शिक्का मारून ठेवला आहे. प्रत्येकीच्या राजवैभवी जीवनाला वेदनेची किनार आहे. राणी कौसल्या, कैकेयी आणि सुमित्रेला सुरुवातीला अपत्यहीनतेचे शल्य उरात बाळगून जगण्याला सामोरे जावे लागले. यात नियतीचा काय हेतू असावा? पुढे स्वतःच्या गुणांनी रमवणारा आणि ज्याच्या कथेत योगी रमतात असा राम, सुलक्षणांनी युक्त लक्ष्मण, विश्वाचे भरणपोषण करणारा भरत आणि आणि शत्रूंचा नाश करणारा शत्रुघ्न अशा चार अलौकिक आणि दिव्य पुत्रांची प्राप्ती तीनही राण्यांना झाली.

हे चारही पुत्र यथावकाश राजनीती, युद्धनीती, प्रजा धर्म, कर्तव्यनिष्ठा यांचे धडे ऋषीवरांच्या मार्गदर्शनात गिरवत होते. त्याच वेळी त्यांच्यातला ऋजू, समंजस, सात्विक, प्रेमळ, संयमी, निश्चयी असा माणूस घडत होता तो त्यांच्या तीनही मातांच्या संस्कारांमुळे. सद्गुणांनी परिपूर्ण अशा पुत्रांची जडणघडण, ज्यांना आज आपण भावनिक बुद्ध्यांक किंवा 'सॉफ्ट स्कील्स' म्हणतो; त्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. बालवयात पुत्रांवर या उन्नत भावनांचे रोपण करण्याचे श्रेय या तीनही मातांचे आहे. रामायणातला हा एक अतिशय महत्त्वाचा पैलू आहे. वाल्मिकी रामायणात रामाचे ७२ गुण सांगितले आहेत.

राणी कौसल्या ही मातृत्वाचे प्रतिक म्हणून नेहमीच गौरवली जाते. तिरुपती बालाजी मंदिरात देवाला जागे करताना 'कौसल्या सुप्रजा रामा, पूर्वा संध्या प्रवर्तते' या भूपाळीमध्ये पहिला उल्लेख कौसल्या मातेचा आला आहे. वनवासाला जाणाऱ्या रामाला बघून ती कोसळते, उन्मळून पडते पण रामानेच समजूत घालून तिला शांत केले आहे. राजधर्म आणि कुलधर्माचे भान ठेवून ती कमालीच्या धैर्याने या प्रसंगाला सामोरी गेली. कैकेयीचा अपराध तिने शांतपणे पोटात घातला. संतप्त झालेल्या भरताला तिने आत्मीयतेने, प्रेमाने कर्तव्याची जाणीव करून दिली. रामाला तिने १४ वर्षे आपल्या नजरेत साठवून ठेवले असून वनवासातल्या रामाला तिच्या दिव्यदृष्टीतून प्रेम आणि बळ मिळाले आहे. म्हणूनच रामरक्षेत 'कौसल्येयो दृशो: पातुं...' असे म्हटले जाते.



राणी कैकेयी ही युद्धनिपूण, बुद्धिमान आणि निग्रही आहे. राजा दशरथाला तिने अनेकदा राज्यकारभारात योग्य सल्ला दिला. तिचे श्रीरामावर भरतापेक्षाही अधिक प्रेम आहे. रामाच्या राज्याभिषेकाच्या वार्तेने ती आनंदून गेली आहे. अशा वेळी या असामान्य राजस्त्रीला मत्सराची बाधा कशी होऊ शकते, हा प्रश्न नेहमीच पडतो. पण याचे उत्तर कैकेयीच्या आईमध्ये तर दडले नसावे? राजा अश्वपती आणि शुभलक्षणा यांची ही कन्या. राजा अश्वपतीला पक्ष्यांची भाषा अवगत होती, पण त्यांचे संभाषण कोणालाही सांगण्याची त्याला अनुमती नव्हती. हे संभाषण सांगितल्यास अश्वपतीचा मृत्यू अटळ होता. एकदा राणी शुभलक्षणाने हे संभाषण सांगण्याचा हट्ट राजाजवळ धरला. या हट्टापायी माझा मृत्यू होऊ शकतो, असे राजाने तिला समजावून सांगितले. तेव्हा राणीचे उत्तर होते, 'मग तुम्ही मरा, पण मला संभाषण सांगा'. अश्वपती राजाने अशा राणीचा त्याग केला आहे. त्यामुळे कैकेयीला मातृसुख मिळाले नाही. पण कदाचित आईचा आततायी, अविवेकी स्वभाव तिच्यात उतरला असावा का? अर्थातच रामायण घडण्यासाठी कैकेयीचा मत्सरभाव जागृत होणे हे विधीलिखितच होते. पण नंतर काही काळाने आपल्या कृत्याचा तिला पश्चातापही झाला आहे. महत्वाचे हे की या प्रसंगामुळे भरताने कैकेयीची निर्भत्सना केली आहे. मात्र रामाच्या मनातील तिचे स्थान अजिबात डळमळीत झालेले नाही.

कायम सन्मार्गाने जाणारी ती राणी सुमित्रा. सौमित्र तिचा पुत्र. पण त्याआधी तो रामाचा उजवा हात, रामाचा बहिश्चर प्राण आणि रामाची सावली आहे, हे ती जाणून आहे. त्यामुळे रामासोबत वनवासात जाण्याच्या निश्चयापासून ती लक्ष्मणाला परावृत्त करत नाही. रामाचे संरक्षण करण्याची क्षमता लक्ष्मणातच आहे हे तिला पक्के ठाऊक आहे. कर्तव्य आणि ममता यांच्यात निवड करायची झाल्यास ममतेला मागे सारणे हा सुमित्रेचा स्वभाव लक्ष्मणातही पूर्णतः उतरला आहे. विवेकी आणि खंबीर असलेली सुमित्रा राजमहालाच्या एका अभेद्य भिंतीप्रमाणे कुटुंबियांना आधार देत राहिली. पुत्रवियोगाने राजा दशरथाचे प्राण गेले पण तीनही राण्या पुत्रवियोग आणि पतीवियोग होऊनही चिवटपणे झुंज देत राहिल्या. श्रीरामांच्या अस्तित्वातून स्वतःची शक्ती एकवटत राहिल्या.

लक्ष्मणाची पत्नी उर्मिला ही सीतेची लहान बहिण आहे. श्रीराम आणि लक्ष्मण यांच्यातील अद्वैत समजून घेणे आणि ते पचवणे हे उर्मिलेतील पत्नीला किती अवघड झाले असेल? सीतेप्रमाणे ती देखील वनवासात जाण्याचा हट्ट करू शकली असती पण तिने तसे केले नाही. वनवासात श्रीराम आणि सीतेचे रक्षण करण्याचे लक्ष्मणाचे कर्तव्य आहे, हे ती जाणून आहे आणि त्या कर्तव्याच्या आड येण्याचे संस्कार तिच्यावर नाहीत. उर्मिलाच्या मूकसंमतीची खात्री असल्यामुळे तिचा पाठिंबा हे लक्ष्मणाचे बळ आहे. लक्ष्मण आणि उर्मिलेमधील अव्यक्त असे परस्परसामंजस्य हे खरे त्यांच्या नात्याचे बलस्थान आहे. उर्मिलेने महालात राहून वनवास भोगला आहे. शांत तेवणाऱ्या ज्योतीप्रमाणे तिने चौदा वर्षे अखंड जळून वनवासातल्या स्वकीयांना आश्वस्त केले आहे.

रामायणाची महानायिका म्हणजे सीता. 'सहचारिणी' हे नाते तिने सर्वोच्च उंचीवर नेऊन ठेवले. श्रीरामाबरोबर सीता काया, वाचा, मन आणि आत्म्याच्या स्तरावर एकरुप झाली आहे. श्रीराम वनवासाला निघाले त्यावेळी वसिष्ठ ऋषींनी सीतेला राजगादीवर बसण्याची सूचना केली होती. यावरुनच तिचे सामर्थ्य लक्षात येते. वनवासात अनेक तात्विक मुद्द्यांवर सीता आणि श्रीरामाच्या चर्चा झाल्या आहेत. अशोकवनात असलेल्या सीतेच्या जवळपासही रावण फिरकू शकला नाही, याला कारण सीतेचे प्रखर तेज. पती श्रीराम आणि राजा श्रीराम यात सीतेने कधीही गल्लत केलेली नाही. पती आणि राजा यातील सीमारेषेची तिला अचूक जाण आहे. 'प्रजेसाठी निर्णय घेताना राजा श्रीरामांनी माझ्यावर अन्याय केलाही असेल कदाचित, पण पती श्रीरामांनी मला एक क्षणही अंतर दिले नाही' असे म्हणणारी सीता ही कायम वंदनीय आहे.

रामनवमीच्या निमित्ताने श्रीरामांच्या जीवनात आलेल्या स्त्रियांचेही स्मरण करणे गरजेचे आहे, कारण 'रामलल्ला' ते 'पुरुषोत्तम' या प्रवासात राजस्त्रियांच्या भूमिकांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रभाव हा पुरुषोत्तमाच्या व्यक्तिमत्वासाठी नक्कीच साह्यभूत ठरला आहे. बालवयात रामाच्या जडणघडणीला तीन मातांनी आकार दिला तर पुढे श्रीरामांनी आपल्या आचरणातून या स्त्रियांना समृद्ध केले. परस्परपूरक अशी ही नाती आहेत. या स्त्रियांच्या आयुष्यात अनेक संकटे, वादळे आली. पण त्यावर धैर्याने, निष्ठेने, श्रद्धेने मात करण्याची शक्ती त्यांना पुरुषोत्तमाच्या प्रभावाने प्राप्त झाली आहे. त्यांच्या अलौकिक चरित्राचा कालप्रवाहावर पडलेला अमीट ठसा आजही वंदनीय, चिंतनीय आणि मार्गदर्शक आहे.

बालविकास कार्यालय स्थलांतरास प्रहार संघटनेचा विरोध

# स्थलांतरित कार्यालयाने महिलांची वणवण

**समाचार/नगर**

महिला, बालक व दिव्यांग लाभार्थींच्या सोयीसाठी जिल्हा महिला व बालविकास विभागाचे स्थलांतरित झालेले कार्यालय शहराच्या ठिकाणी शासकीय जागेत स्थलांतरित करण्याची मागणी प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

शहरापासून लांब असलेल्या नगर-कल्याण रोडवर सदरचे कार्यालय स्थलांतरित झाल्याने महिला, बालक व दिव्यांगांची मोठी गैरसोय होत असल्याने लाभार्थींसह जिल्हाधिकारी कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा प्रहार अपंग क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे यांनी दिला आहे. जिल्हा महिला व बालविकास विभागाचे कार्यालय शहराच्या मध्यवर्ती भागात सर्जेपुरा येथे होते. त्यामुळे महिला, बालक व दिव्यांग लाभार्थींना तेथे येणे सोयीस्कर होते. परंतु सध्याचे कार्यालय स्थलांतराबाबत घेतलेला निर्णय हा महिला, बालक व दिव्यांग लाभार्थी यांना अतिशय अडचणीचा व खर्चिक आहे.

सदर कार्यालयाची जागा जिल्हा न्यायालयापासून सुमारे १० किलोमीटर अंतरावर तर बस स्थानक व रेल्वे स्टेशन येथून सुमारे १० ते १२ किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावर आहे. त्यामुळे महिला, बालक व दिव्यांग लाभार्थी यांना महाराष्ट्र शासनाच्या योजनेचा लाभ घेता येणार नाही. त्यामुळे या लाभार्थींना त्यांच्या नैसर्गिक अधिकारापासून वंचित राहण्याची वेळ येणार असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

मतदान केंद्रांवरील सुविधांचे नियोजन करा

## नोडल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा

**समाचार/नगर-दि.१३**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या विविध जिल्हास्तरीय पथकप्रमुख (नोडल अधिकारी) यांची शुक्रवारी राहाता येथे बैठक झाली. अपर जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी (शिर्डी लोकसभा मतदार संघ) यांनी बाळासाहेब कोळेकर नोडल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा घेतला. प्रत्येक पथकाने निवडणुकीच्या अनुषंगाने दिलेल्या जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडावी. तसेच निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार मतदारांना मतदान केंद्रावर पुरविण्यात येणाऱ्या सुविधांबाबत सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि तहसीलदार यांनी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. अपर पोलीस अधीक्षक वैभव कालबुरगे, राहाता सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी माणिक आहेर, अकोले सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी रामदास जगताप आदि उपस्थित होते. पहिल्या टप्प्यात निवडणूक खर्च, नामनिर्देशनपत्र, कायदा व सुव्यवस्था, विविध ॲप्लिकेशन्स आणि सायबर सुरक्षा, वाहतूक व्यवस्था, पोस्टर बॅलेट, भरारी पथके आदि बाबींसाठी नियुक्त पथक प्रमुखाचा आढावा आला. आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीसाठी भरारी पथके, स्थायी पथके आणि व्हिडीओ सर्व्हिलंस टीम तैनात करण्यात आल्या आहेत. या सर्व पथकांनी आपल्यावर सोपवलेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी. आदर्श आचारसंहिता कालावधीत अवैध मद्यविक्री किंवा वाहतूक, रोकड, अंमलीपदार्थ वाहतूक होत असल्यास भरारी पथके, स्थायी पथके, तसेच संबंधित विभागांनी गठीत केलेल्या पथकांनी त्वरित कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल संबंधित अधिकाऱ्यांना सादर करावा. आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीसाठी तालुकास्तरीय नोडल अधिकाऱ्यांनी दक्ष राहून काम करावे, अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

# वंचित बहुजन आघाडीतर्फे महात्मा फुले यांना अभिवादन



**समाचार/नगर**

बहुजन समाजाचे दु:ख, कष्ट, वेदना, हालाखीचा संघर्ष प्रत्यक्षात त्यांनी पाहिला. जनसामान्यांच्या स्वाभिमानाची जपवणूक करण्यासाठी स्वत:चे आयुष्य पणाला लावले. वास्तविक जीवन संघर्षातून समाज उभा करण्याचे महान कार्य ज्योतिबांनी केले म्हणून ते महात्मा झाले. शैक्षणिक, सामाजिक कार्याचा विडा उचलला. म्हणून अशा या क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार अनमोल प्रेरणादायी आहेत ते प्रत्यक्षात कृतीत आणण्याची खरी गरज असल्याचे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव योगेश साठे यांनी केले.

सावेडी उपनगरात गुलमोहोर पोलिस चौकीजवळ वंचित बहुजन आघाडीच्यावतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी योगेश साठे, ॲड. लक्ष्मीकांत पठारे, शिरिष जानवे, प्रशांत शिंदे, प्रा.अतुल चौरपगार, दिलीप साळवे, स्वप्नील वैद्य, विश्वास नवले, सोपान शेळके, कारभारी कराळे, नानू दासी तसेच बारा बलुतेदार महासंघाचे माऊली गायकवाड, शाम औटी, सुरेश चुटके, दिलीप काकडे, शैलेश धोकटे, एकविरा चौक मालवाहतूक संघटनेचे देवीदास भालेराव, संतोष पवार, किरण चव्हाण, सचिन पवार, सचिन हांडे, पप्पू तागड, माऊली दळवी आदि उपस्थित होते.

# नवनागापूरला उद्यापासून कीर्तन महोत्सव सोहळा

**समाचार/नगर**

नवनागापूर (ता.नगर) येथील मनोरमा कॉलनीतील श्रीराम मंदिराच्या पंधराव्या वर्धापन दिनानिमित्त रविवार दि.१४ ते बुधवार दि.१७ कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले आहे.

रविवारी दि.१४ सकाळी ग्रंथपूजन, सायंकाळी ५ वा हरिपाठ, रात्री ७ ते ९ भागवताचार्य मनोहर महाराज सिनारे यांचे कीर्तन होणार आहे. सोमवारी दि.१५ सायंकाळी ५ वा. हरिपाठ, रात्री ७ ते ९ भागवताचार्य यशवंत महाराज थोरात यांचे कीर्तन होईल. मंगळवारी दि.१६ सायंकाळी ४ वा. ग्रंथ दिंडी, सायंकाळी ५ वा. हरिपाठ, रात्री ७ ते ९ शिवशाहीर कल्याण महाराज काळे यांचे कीर्तन होईल.

ददरोज कीर्तन संपल्यानंतर अनुक्रमे चंद्रकांत पाचारणे, रावसाहेब गोरे, विनायक भोर यांच्याकडून महाप्रसाद दिला जाणार आहे. बुधवारी दि.१७ सकाळी १० वा. शालिनीताई इंदोरीकर यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर उद्योजक सोमनाथ बडे, गहिनीनाथ नागरगोजे यांच्यावतीने महाप्रसाद वाटप होणार आहे.

गायनाचार्य कानिफनाथ महाराज पंडित, संतोष महाराज हिंगोलीकर, पांडुरंग महाराज जगदाळे, रावसाहेब महाराज ससे आदी गायनाची साथ देणार आहेत. साथसंगत श्रीराम महिला भजनी मंडळी मनोरमा कॉलनी, विरोबा भजनी मंडळ, ससेवाडी गोरक्षनाथ भजनी मंडळ, पाईपलाईन रोड हे देणार आहेत.

## इनामदार यांचा सत्कार

**समाचार/नगर**

अजीज इनामदार यांची नोटरीपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा हरियाली संस्था व मॉर्निंग ग्रुप यांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ सदस्य गणाभाऊ होनराव, विजय गुंदेचा, सागर करमकर, महेंद्र रामदीन, अमृतलाल छल्लाणी, राम हुंडेकरी, राजू वाडेकर आदी सदस्य उपस्थित होते.

मेळाव्यास दोनशे गोरक्षकांची उपस्थिती

# गोरक्षणासाठी सर्वतोपरी मदत करणार-शहा

**समाचार/नगर**

दुष्काळी परिस्थितीत नगर जिल्ह्यातील गोशाळेच्या मागे उभा राहणार असून गोरक्षकांना गोरक्षण करण्यासाठी सर्व प्रकारची मदत करण्याचे आश्वासन वर्धमान संस्कारधामचे राजू शहा यांनी दिले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांनी प्रेरित होऊन गोरक्षकांचे गौसेवेचे कार्ये अविरतपणे करीत आहेत.गौसेवा हे इश्वरीय कार्ये आहे.गौमातेला कसायांच्या तावडीतून सोडवावे हे गोरक्षकांचे कर्तव्य आहे. त्याच बरोबर गोरक्षण कसे करावे. याविषयी मार्गदर्शन आखिल भारतीय कृषी गौसेवा महासंघाचे मिलिंद एकबोटे यांनी केले.





महाराष्ट्र प्राणी कल्याण कायदा संनियंत्रण समिती चे उपसमिती अध्यक्ष अँड.अशोक जैन यांनी गोरक्षण करण्यासाठी लागणारे व सर्व प्रकारची कायदेशीर मदत २४ तास देण्याचे आश्वासन दिले.आणि गोरक्षक आणि गोसंवर्धन बाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. असे मनोगत व्यक्त केले.

कायदेशीर सल्लागार ॲड किशोर जैन यानी गोरक्षणाचा कायद्याचा चौकटीत राहून गोरक्षण कसे करावे.या विषयक माहिती गोरक्षकांना दिली. गोशाळा आणि गोरक्षण काळाची गरज असल्याचे मत भाजपाचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा यांनी व्यक्त केले.

या मेळाव्या प्रसंगी हभप रवींद्रनाथ महाराज सुद्रिक, हिंदू राष्ट्र सेनेचे जिल्हाध्यक्ष संजय आडोळे,जीवदया गोशाळेचे राजू भाई दोशी,मयूर राजपुरोहित, सतीश मोरे, मनीषा काळे ,निसर्गसृष्टी गोपालन संस्थेचे अध्यक्ष डॉ. विलास जाधव,खजिनदार गजेंद्र सोनवणे,विश्वास बेरड, बजरंगदलाचे विशाल काटे,सनी थोरात,अमोल हुंबे पाटील,विशाल काटे,मिलिंद राऊत,सरपच संजय गेरंगे, श्रीकांत साठे,अवीनाश सरोदे,दिनेश हिरगुडे,मनोज फुलारी,ॲड.अक्षय काळे,महेश कराळे ,गणेश कराळै,बाळासाहैब खताडे,बाळासाहेब भुजबळ, तात्याराव क्षीरसागर,विष्णु कुलकर्णी,अर्थव सप्तर्षी आदींसह नगर,बीड ,जालना जिल्हा मधील वीस हुन अधिक गोशाळा प्रतिनिधी व दोनशेहुन अधिक गोरक्षक उपस्थित हौते.

## शब्दकोडे-१४

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ■ | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | ■ | ८ |
| ९ | | ■ | | ■ | १० | ■ | ११ | १२ | | ■ | १३ | १४ | |
| | ■ | १५ | | १६ | | १७ | | | ■ | १८ | | | ■ |
| १९ | | | ■ | २० | | | | | ■ | २१ | | ■ | २२ |
| | ■ | २३ | २४ | | ■ | | ■ | ■ | २५ | ■ | २६ | २७ | |
| ■ | २८ | ■ | | ■ | २९ | | ३० | ■ | ३१ | ३२ | | | ■ |
| ३३ | | ३४ | | ३५ | | ■ | ३६ | ३७ | ■ | ३८ | | ■ | ३९ |
| | ■ | | ■ | ४० | | ४१ | ■ | ४२ | | | ■ | ४३ | |
| ४४ | ४५ | | | ■ | ४६ | | ■ | | ■ | ४७ | ४८ | ■ | |
| ■ | ४९ | | ■ | ५० | ■ | | ■ | ५१ | | ■ | ५२ | ५३ | |
| ५४ | | ■ | ५५ | ■ | ५६ | | ५७ | | ■ | ५८ | | | |
| ५९ | | ६० | | ६१ | | ■ | | ■ | ६२ | | ■ | ■ | ■ |
| | ■ | ६३ | | | ■ | ६४ | ■ | ६५ | | | | ६६ | ६७ |
| ६८ | | | ■ | ६९ | | | | | ■ | | ■ | ७० | |

**आडवे शब्द**

१) मुलांचा खाऊ
४) इंद्राच्या दरबारातील एक अप्सरा
६) खबदाड
९) अरण्य
११) कालवा (हिं)
१३) सातू
१५) कहाणीतील गाव
१८) पडणे
१९) पठण
२०) कातावणे, रागने दात ओठ खाणे
२१) मेहुणा, बायकोचा भाऊ
२३) गाव
२६) पचपचीत, बेचव
२९) सदोदित
३१) नुकतेच जन्माला आलेले
३३) दृष्टीभेट
३६) पंख
३८) गमन करणे
४०) कप्पा, खण
४२) गाई-म्हशीचे एक खाद्य
४३) घट्ट तणाव
४४) रसाळ
४६) पद्धत
४७) पोपट
४९) महिना
५०) गाय
५१) बासरी
५२) चणचण, शंका
५४) कृष्णसखी
५६) अठरा पुराणातील एक
५८) क्षणभर
५९) आपले राष्ट्रगीत
६२) मोठा जाड अंगरखा, तट
६३) तरूण
६५) आपला-परका अशी भावना
६८) रेशीमाचे जाडसर कापड
६९) दृष्टीआड
७०) मगज

**उभे शब्द**

१) कलकलाट
२) अंतःकरण
३) हळूच मारलेली थप्पड (वा.प्र.)
५) घोटाळा
६) हात
७) नाश पावणे
८) कलेवर, प्रेत
१०) पायताण
१२) पराभूत होणे
१४) शरीर
१५) मुख, चेहरा
१६) खुंटी, मेख
१७) तिरस्कार
१८) अर्धी ओंजळ
२२) छोटे कुबड
२४) मान, गळ्या मागचा अवयव
२५) गप्प बसण्याचे एक व्रत
२७) अब्रू, प्रतिष्ठा
२८) प्रत्येक दिवशी
२९) शासकीय
३०) बारा वर्षाचा काळ
३२) बेरीजच्या विरूद्ध
३३) न जगणारे, नष्ट होणारे
३४) छत्रपती शिवाजी महाराजांचे आध्यात्मिक गुरू
३५) सोन्याचा धागा
३७) दागदागीने
३९) देवीचा एक वार, दिवस
४१) नातेवाईक
४५) संतोष, आनंद
४८) कणीदार (तूप)
५३) आकाश
५४) राजाची कारकीर्द
५५) जंगलातील आग
५६) अवधान, चित्त
५७) रंग
५८) झटपट, लवकर
६०) घड्याळाचा जागवणारा मोठा आवाज
६१) चिंतन
६२) खोपटी, राग, त्वेष
६४) नवे, न वापरलेले
६५) विहिर
६६) हिस्सा
६७) नवरदेव

## शब्दकोडे-१३ चे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सु | धा | र | क | ■ | का | ल | वा | ■ | क | ■ | ध | ड | सा |
| पा | ■ | सा | र | वा | न | ■ | चा | क | र | मा | नी | ■ | स |
| री | त | ■ | व | ट | व | ट | ■ | स | क | ल | ■ | पा | व |
| ■ | प | रा | त | ■ | ला | व | णी | ■ | री | ■ | का | प | ड |
| म | न | न | ■ | बे | ■ | का | ■ | म | त | मो | ज | णी | ■ |
| ज | ■ | टी | का | का | र | ■ | खं | त | ■ | ग | ळ | ■ | स |
| ल | ता | ■ | न | र | मा | ई | ■ | दा | द | रा | ■ | ख | ट |
| द | र | म्या | न | ■ | ■ | श्व | स | न | ■ | ■ | क | स | र |
| र | ■ | न | ■ | बे | श | र | म | ■ | सा | ध | ना | ■ | फ |
| म | ग | ■ | खे | ट | र | ■ | स्त | व | न | ■ | त | र | ट |
| ज | ल | द | ■ | कु | द | ळ | ■ | सा | वि | त्री | ■ | सा | र |
| ल | ■ | ■ | मा | ळी | ■ | ■ | अ | ■ | वि | ■ | का | त | ■ |
| ■ | वा | म | न | ■ | ना | ग | रि | क | ■ | हे | म | ल | ता |
| को | ट | ■ | व | न | च | र | ■ | ■ | सा | म | ना | ■ | रा |

# आपले भविष्य

दि.१४/०४/२०२४ ते २०/०४/२०२४

**शिरीष कुलकर्णी**
**मो.नं.८७८८२६६६९०**

### मेष: स्थावर व्यवहारासाठी उत्तम काळ

नोकरदारांना कामाचा मोबदला अधिकार प्राप्तीने लाभेल. स्थावर व्यवहारासाठी उत्तम काळ आहे. प्रयत्नाने तुमच्या महत्वाकांक्षांना पूर्णत्व लाभू शकते. ऐहिक सुखांची रेलचेल राहील. कलात्मक कामात वेगवान प्रगती शक्य आहे. साहित्य, कला, जाहिरात अशा क्षेत्रात मोठी प्रगती साधता येणे किंवा मोठे आर्थिक लाभ संभवतात. सप्ताहाच्या शेवटी तुमच्या प्रगतीत येणाऱ्या प्रत्येक अडथळ्यांवर मात कराल.

### वृषभ: नोकरदारांना मोठ्या उपक्रमात सहभागी होण्याची संधी लाभेल.

आर्थिक क्षेत्र, संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान, विविध व्यापार, मौल्यवान वस्तू आणि दागिन्यांचे व्यापार अशा क्षेत्रात वेगवान आर्थिक प्रगती होणे शक्य आहे. नोकरदारांच्या परिश्रमांची वरिष्ठ पातळीवरून योग्य ती दखल घेतली जाऊ शकते. उत्तरार्धात अनेक नोकरदारांना मोठ्या उपक्रमात सहभागी होण्याची संधी लाभेल. सप्ताहाच्या शेवटी नातेसंबंध टिकविण्याच्या प्रयत्नांना यश लाभेल.

### मिथुन: प्रवासाचे योग संभवतात.

स्वतःची प्रतिमा जपण्याचे प्रयत्न केले तरी प्रतिष्ठेचे अवडंबर माजवू नका. महत्वाचे निर्णय घेताना भावनांवर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. छोटे व्यापार, साहित्य, पत्रकारिता अशा क्षेत्रात आर्थिक प्रगती समाधानकारक राहील. उत्तरार्धात अनेकांना प्रवासाचे योग संभवतात. सप्ताहाचा शेवट मतभेदांचा असला तरी तारतम्याने परिस्थिती हाताळली जाईल. आर्थिक अपेक्षा पूर्ण होतील.

### कर्क : अध्यात्मिक मार्गाने मन:शांती लाभेल.

पत्नीच्या नोकरीबाबत मोठे निर्णय घेणे नुकसानकारक ठरू शकते. संसारिक अडचणी त्रस्त करण्याची शक्यता आहे. स्वतःच्या आरोग्यावर धावपळीचा परिणाम होणार नाही याची काळजी घ्या. अध्यात्मिक मार्गाने मनःशांती लाभेल. संगणक क्षेत्रातील अभियंत्यांना अनपेक्षित अशा काही अडचणींना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात आर्थिक खर्च व्यर्थ जातील.

### सिंह : उत्साह आणि नैराश्य यांचा लपंडाव अनुभवास येईल.

संसारिक जीवनात अनपेक्षित अडी अडचणी येण्याची शक्यता आहे. व्यर्थ चिंता करत बसण्यापेक्षा वास्तवात जगून मार्ग शोधा. कला आणि साहित्य क्षेत्राची निर्माण झालेली आवड तुमचा या क्षेत्रातील सहभाग वाढवेल. ऐहिक सुखांचा पाठपुरावा कराल. उत्तरार्धात उत्साह आणि नैराश्य यांचा लपंडाव अनुभवास येईल. सप्ताहाच्या शेवटी धार्मिक किंवा आध्यात्मिक कृत्ये मानसिक समाधान देतील.

### कन्या : राजकीय वजन वाढेल.

नोकरीत मान सन्मान होतील. सामाजिक आणि राजकीय वजन वाढेल. घरगुती आघाडीवर मात्र कुटुंबियांची नाराजी दूर करणे कठीण होईल. विशेषतः पत्नीची समजूत घालणे हे कौशल्याचे काम ठरेल. शुक्रवार प्रतिकूल घटनांचा आणि तात्कालिक चिंता वाढवणारा आहे. उत्तरार्धात जिद्दीने ठोस निर्णय घेऊन अडचणीतून मार्ग काढाल. सप्ताहाच्या शेवटी महिलांची भावनिक घुसमट शक्य आहे.

### तूळ : कौटुंबिक आनंदाचे क्षण अनुभवाल.

सर्वच क्षेत्रात चित्तवृत्ती आग्रही राहतील. सट्टा, रेस किंवा तत्सम पैसे मिळविण्याच्या प्रकारात नुकसान होण्याचीच शक्यता जास्त आहे. नोकरदारांना प्रयत्नाने यशप्राप्ती होऊ शकते. सरकारी कामे किंवा कोर्ट कचेऱ्या या मध्ये तडजोडी कराव्या लागतील. उत्तरार्धात आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक करावेत. सप्ताहाच्या शेवटी कौटुंबिक आनंदाचे क्षण अनुभवता येणार आहेत.

### वृश्चिक : साहित्य क्षेत्रातील व्यक्तींना प्रगतीकारक काळ.

नैराश्याने आणि परिस्थितीजन्य ताण तणावाने अस्वस्थ व्हाल. व्यावसायिक जीवनातील मानसिक गोंधळ वाढते राहतील. स्थिर चित्ताने परिस्थिती हाताळल्यास आर्थिक किंवा भावनिक नुकसान टाळता येईल. उत्तरार्ध कला आणि साहित्य क्षेत्रातील व्यक्तींना प्रगतीकारक राहील. सप्ताहाच्या शेवटी आहारातील अनियमितपणा उत्साह आणि कार्यक्षमता कमी करणारा आहे.

### धनु : कौटुंबिक वातावरण चैतन्यमय राहील.

दूरदृष्टी, चिकाटी आणि परिश्रम यांच्या सहाय्याने व्यावसायिक यश प्राप्ती शक्य आहे. नोकरीत अधिकार आणि सन्मान यांचा लाभ होईल. कौटुंबिक वातावरण चैतन्यमय राहील. घरात सुख, समाधान आणि आनंद भरून राहील. उत्तरार्ध कला, माहिती तंत्रज्ञान अशा क्षेत्रासाठी आर्थिक प्रगती करणारा राहील. सप्ताहाचा शेवट अधिकार प्राप्ती, पदालाभ किंवा पुरस्कार यांचा लाभ करून देणारा आहे. इच्छा आणि अपेक्षा पूर्णत्वाला जातील.

### मकर : कौटुंबिक आघडीवर समजूतदारपणा आवश्यक

आर्थिक स्थैर्य लाभले तरी संसारिक खर्चाचे प्रमाण वाढते राहील. स्वतःच्या तिखट बोलण्याने कोणाचे शत्रुत्व ओढवून घेऊ नका. दैनंदिन जीवनात स्त्रियांची मोठी मदत होईल. महिला सौन्दर्योपासना करण्यात दंग राहतील. माहिती तंत्रज्ञान किंवा साहित्य क्षेत्रात प्रयत्नाने अपेक्षित यश प्राप्ती करू शकाल. उत्तरार्धात सुखवृद्धीसाठी केलेले खर्च व्यर्थ ठरतील. सप्ताहांती कौटुंबिक आघडीवर समजूतदारपणा आणि शांतपणा आवश्यक आहे.

### कुंभ : कौटुंबिक जीवनांत मतभेद शक्य

सात्विक विचार आणि इतरांसाठीच्या सद्भावना तुम्हाला मनःशांती देतील. तुमच्या राशीतील शनी आणि मंगळ सातत्याने भावनोद्रेक करण्याची शक्यता आहे. अनाठाई खर्च किंवा इतर कारणाने होणारा धननाश टाळायचा प्रयत्न करा. रसिकता वाढली तरी भावनिक कुचंबणा झाल्याने साहित्य आणि कलेतील आनंद घेता येणार नाही. उत्तरार्धात कौटुंबिक जीवनांत मतभेद आणि अपेक्षाभंग शक्य आहेत.

### मीन : परिश्रमांना मर्यादित यश प्राप्ती

कौटुंबिक आघाडीवरील मतभेद आणि नैराश्य दैनंदिनी गढूळ करत राहील. भावनिक प्रसंग चित्त चांचल्यात भर घालतील. कलात्मक आवड जोपासण्याची इच्छा असली तरी संधी मिळणे कठीण आहे. उत्तरार्धात मनपसंत खरेदी करता येईल. नोकरदारांच्या परिश्रमांना मर्यादित यश प्राप्ती होऊ शकते. सप्ताहाच्या शेवटी जवळचे नातेवाईक आणि हितचिंतक यांची मदत होईल.

PDF Compressor Free Version



### मैलामिश्रीत पाण्याने दुर्गंधी; आठवड्यापासून नळ कोरडेच

# मुकुंदनगरमध्ये पाणी, ड्रेनेजचा प्रश्न गंभीर



**समाचार/नगर-**

मुकुंदनगर येथील गोविंदपुरा भागातील बडी मरियम मशिदच्या मागील गल्लीमध्ये गेल्या आठ दिवसापासून नळाला पाणी न आल्याने नागरिकांवर भर उन्हात पाण्यासाठी भटकंतीची वेळ आली आहे. तसेच याच परिसरात घरांसमोर ड्रेनेजचे पाणी साचल्याने आरोग्याचा प्रश्नही उभा ठाकला आहे. ऐन रमजान महिन्यातच नागरिकांना महिनाभरा पासून या समस्यांना तोंड द्यावे लागले.

शहरातील गोविंदपुरा भागातील बडी मरियम मशिदच्यामागील गल्लीमध्ये नागरिकांना गेल्या आठ दिवसांपासून नळाला पाणी आले नाही. रमजान सारखा सण विना पाण्याने साजरा करावा लागला. या परिसरातील नागरिकांना भर उन्हाळ्यामध्ये महिनाभरा पासून पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे.या गल्ली समोरील शेजारच्या गल्लीमध्ये महानगरपालिकेने

सिमेंटचा रस्ता केला आहे. हा रस्ता करताना ठेकेदाराने भूमिगत गटारीचे चेंबरच बंद करून टाकले आहे. त्यामुळे मैलामिश्रित पाणी दारात साचले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. परिसरात डासांचे प्रमाण वाढले आहे.महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधला असता त्यानंतर तीन दिवसांपूर्वी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील अभियंत्याने येऊन पाहणी केली आणि आजच तुम्हाला पाणी येईल, असे आश्वासन दिले. परंतु अद्यापपर्यंत पाणी मिळालेच नाही.

मरियम मशिदच्या मागील गल्लीमधील नागरिकांचे नळजोड तोडून टाकले आहेत. यामुळे येथील घरांना गेल्या आठ दिवसांपासून पाणी आले नाही.या सर्व समस्यांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रशासन व नगरसेवकांबद्दल मोठी नाराजी पसरलेली आहे. त्यांच्याकडे कोणीही लक्ष द्यायला तयार नाही. अशा परिस्थितीत स्थानिक नागरिक कधीही मोठ्या आंदोलनाच्या तयारीत आहे.



# माळी बाभूळगावमध्ये 'मेरा बुथ सबसे मजबूत' उत्साहात

**समाचार/नगर-**

दहा वर्षात केलेल्या विकासाच्या मुद्यावर नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होणार आहेत. जनतेनेही महायुतीच्या पाठीशी उभे रहावे, असे आवाहन खा.सुजय विखे यांनी केले.

पाथर्डी तालुक्यातील माळी बाभूळगाव येथे आयोजित मेरा बुथ सबसे मजबूत कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार मोनिका राजळे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, बूथ प्रमुख आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

ते म्हणाले की, राज्यात महायुतीने ४५ प्लसचे लक्ष ठेवले असून महायुती तेवढ्या जागा जिंकणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्यात महाराष्ट्राचा मोठा वाटा असणार आहे.

महाविकास आघाडीकडे विकासाचे कोणतेही व्हिजन नाही. पंतप्रधानपदाचा त्यांच्याकडे चेहरा नाही. त्यांच्यात सध्या हेवेदावे सुरू आहेत. ४ जूनला महाविकास आघाडी आणि इंडीया आघाडीचा जनता दारुण पराभव करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# कोंडा यांचे यश उल्लेखनीय - मंगलारम



**समाचार/नगर-**

केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा ही अवघड परीक्षा पैकी एक आहे घरातच वडिलांच्या रूपाने प्रशासकीय व सामाजिक कार्याचा असलेला वारसा लाभलेल्या अमोल कोंडा यांनी मिळवलेले यश हे पद्मशाली समाज व नगरकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा आहे. अमोल यांनी आपले हे यश आपल्या पुरते मर्यादित न ठेवता समाजातील व शहरातील होतकरू तरुणांना ही मार्गदर्शन करावे. असे प्रतिपादन राष्ट्पती पुरस्कार प्राप्त शिक्षक नारायण मंगलारम यांनी केले आहे.

अहमदनगर महानगर पालिकेचे माजी उपायुक्त दिगंबर कोंडा यांचे ज्येष्ठ सुपुत्र अमोल यांची नुकत्याच झालेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवून विमान उड्डाण अधिकारी पदावर निवड झाल्याबद्दल गांधी मैदान येथील मार्कंडेय देवस्थान कमिटी व पद्मशाली समाज बांधव यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात देवस्थान कमिटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मंगलारम, उपाध्यक्ष त्रिलेश येनगंदुल,सचिव कुमार आडेप आदी मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी दत्तात्रय जोग,लक्ष्मण झगे, रघुनाथ गर्जेगी,शंकर नक्का, शिवाजी संदूपटला, भीमराज शिरसुल, रमाकांत बिज्ञा, रमेश भूसा,शेखर दिकोंडा, विनायक बत्तीन, कृष्णा संभार,हनुमान म्याकल, हनुमंत जोग,विजय येनगंदुल, ऋषिकेश गुंडला, श्रीनिवास वंगारी, सागर सबबन, विठ्ठल गुंडू, नितीन गाली,ज्योती गाली,व्यंकटेश नक्का,श्रीनिवास एल्लाराम,शुभम सुंकी,दत्तात्रय अडगटला,बालकिसन आकुल आदींसह मोठया संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

# केडगावच्या कीर्तन महोत्सवाला प्रतिसाद

**समाचार/नगर-**

गुढीपाडव्या निमित्त केडगाव, शाहूनगर रोड येथील पाच गोडाऊनच्या प्रांगणात किर्तन महोत्सवाला पंचक्रोशीतील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. किर्तनात भाविक तल्लीन होत असून, किर्तनातून समाज प्रबोधन केले जात आहे. जनसेवक अमोल येवले मित्र मंडळ व छत्रपती फाउंडेशन (ट्रस्ट) यांच्या माध्यमातून किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमाचे हे तिसरे वर्ष आहे.

स्व. सुभाषकोंडीराम वाघ यांच्या स्मरणार्थ किर्तन महोत्सवाचे दुसरे पुष्प ह.भ.प. डॉ. प्रविण महाराज दुशिंग पाटिल यांनी गुंफले. दुशिंग



महाराज म्हणाले की, येणारी पिढी टिकवायची व घडवायची असेल तर चांगले संस्कार देण्याची गरज आहे. संस्कार नसल्याने आजची पिढी चुकीच्या मार्गाला जात असून, अनेक व्यसन जडताना दिसत आहे. खरी संपत्ती म्हणजे आपली संतती आहे. मुलांना घडविण्यासाठी आई-वडिलांची भूमिका महत्त्वाची असते, त्याप्रमाणे त्यांना बिघडण्यासाठी देखील आई-वडिलच जबाबदार असतात. मुलांच्या हातात लहानपणापासूनच मोबाईल दिला जात आहे. तर आई टिव्हीचे सिरीयल पाहण्यात गुंतली आहे. तर वडिल कामानिमित्त घराबाहेर असतात. यामुळे संस्कारापासून मुली दुरावत आहे. मुलांना संत, ग्रंथ, महंत, भगवंत समजवून सांगण्याची वेळ आहे.

# गाडगे महाराज छात्रालयातील विद्यार्थ्यांना निरोप

**समाचार/नगर-**

जिल्हा सहकारी बँक समोरील आबासाहेब काकडे शिक्षण समुहाचे श्री.संत गाडगे महाराज छात्रालय स्टेशन रोड या वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांना उन्हाळा सुट्टी निमित्त आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड. डॉ. शिवाजी काकडे व जिल्हा परिषद सदस्या हर्षदा काकडे यांच्या संकल्पनेतून व प्रेरणेने निरोप देण्यात आला, अशी माहिती वसतीगृहाचे अधीक्षक बाबासाहेब पातकळ यांनी दिली.

वसतीगृहाचे अधीक्षक बाबासाहेब पातकळ यांचे भाषण झाले. आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या वतीने विद्यार्थ्यांचा वर्षभरातील प्रगतीचा आढावा घेतला. जिल्हास्तरीय व पुणे नाशिक, सोलापूर या विविध विभागीय स्तरीय परीक्षेमध्ये व क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घेतला



त्या मध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी जगन्नाथ बोडखे, लक्ष्मण बिटाळ, सामाजिक कार्यकर्ते विजय परदेशी, तसेच विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अनिल रोकडे,भाऊसाहेब आव्हाड,सुशील पाखरे,अनिल तिजोरे, राष्ट्रीय पाठशाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

# एटीएम फोडण्याचा प्रयत्न करणारा ताब्यात

**समाचार/नगर**

सर्जेपुरा रस्त्यावरील लालटाकी येथील एटीएम मशिन फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. गोविंद दंडपत (रा. खडकपूर, पश्चिम बंगाल) असे आरोपीचे नाव आहे.

या प्रकरणी निलेश कार्ले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुरुवारी पहाटे ३.३० वा. आरोपी एटीएम मशिनमध्ये घुसला त्याने एटीएम मधील पैसे चोरण्यासाठी मशिन फोडण्याचा प्रयत्न केला. ही बाब सुरक्षा रक्षकाच्या लक्षात आल्यानंतर त्याने त्याला पकडले.

# तणाव मुक्तीवर २२ पासून मोफत अभ्यासक्रम

**समाचार/नगर-**



निरोगी जीवनाची गुरूकिल्ली म्हणजे राजयोगा जीवनपध्दती! जगभरातील लाखो व्यक्ती याचा लाभ घेत आहेत आणि सदर कोर्स मोफत स्वरूपात २२ ते २६ एप्रिल या ५ दिवसात संध्या ७.३० ते ९ या कालावधीत साई सूर्य नेत्रसेवा, माणिक चौक, येथे संपन्न होत आहे. या कोर्समध्ये राजयोगा जीवनपध्दतीच्या अभ्यासक डॉ. सुधा कांकरिया मार्गदर्शन करणार आहेत. जास्ती जास्त नागरीकांनी याचा लाभ घ्यावा, असे ब्रह्माकुमारीज गीतापाठशाला आणि रोटरी पीस सेंटर द्वारा करण्यात आले आहे. या मोफत राजयोगा मेडिटेशनची नांवनोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रिया दिदी यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे. वय वर्षे १० पेक्षा जास्त वयोगटातील स्त्री पुरूषांना यात सहभागी होता येईल.

सदर कोर्स ब्रह्माकुमारीज् गीता पाठशाळा आणि रोटरी क्लब ऑफ अहमदनगर संचलित रोटरी पीस सेंटर यांच्या संयुक्त विद्यमानाने संपन्न होत आहे.

### भारतीय जैन दिवाकर मंच

# युवा शाखा राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी यश शहा

**समाचार/नगर-**

राष्ट्रसंत गुरुदेव कमलमुनी कमलेशजी महाराज यांच्या शुभाशीर्वादाने अखिल भारतीय जैन दिवाकर मंच,नवी दिल्ली यांच्या युवा शाखेची राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.यामध्ये नगर येथील इंजि.यश शहा यांची राष्ट्रीय कार्याध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली.

जैन दिवाकर मंच संपूर्ण भारतात समाजाच्या विविध प्रश्नांवर काम करत आहे. त्यामध्ये विरांगनांना स्वावलंबी बनविणे , गो मातेला राष्ट्रीय दर्जा मिळवून देण्यासाठी गो मंत्रालय बनवण्याचे काम प्रामुख्याने हाती घेतले आहे.त्यासाठी राष्ट्रसंत भारतभर पदभ्रमण करत आहेत.

इंजि.यश शहा यांची नियुक्ती करताना ते म्हणाले की तरुणांनी सामाजिक आणि राष्ट्रीय कार्यात पुढे येणे गरजेचे आहे, त्यासाठी भारतभरातून युवकांना मोठ्या प्रमाणात



संधी दिली जात आहे. शहा यांच्या तरुण वयातील सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांची नियुकी करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर गोसेवा, अल्पसंख्यांक आणि विहार संबंधित कामांची विशेष जबाबदारीही शहा यांच्यावर सोपवण्यात येणार असल्याचे सांगितले. यश शहा हे स्थापत्य अभियंता असून असून बांधकाम व्यासायाबरोबर सामाजिक करीत देखील अग्रेसर असतात. या नियुक्तीबद्दल कैवल्यरत्नाश्रीजी (कैवल्यधाम) साध्वी गुरु महाराज व इतर साधु- साध्वी गुरु भगवंतांनी शहा यांना आर्शीवाद देत अभिनंदन केले.त्यांच्या या निवडीबद्दल नगर मधून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### १८ एप्रिलपर्यंत भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन

# शिवमहापुराण कथेमुळे नेप्ती भक्तिमय

**समाचार/नगर-**

नगर तालुक्यातील नेप्ती येथे श्रीराम नवमी निमित्त श्रीराम सेवा मंडळ व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम मंदिरासमोर शिवमहापुराण संगीत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी श्रीराम विजयग्रंथ व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा होणार आहेत. या सोहळ्याचे आयोजन दि.११ ते १८ एप्रिल दरम्यान करण्यात आले आहे.

ह. भ. प. रामेश्वर महाराज चव्हाण सुकळीकर व मंडळाचे अध्यक्ष बबन फुले यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कथेला प्रारंभ करण्यात आला. दि. १७ एप्रिल रोजी सकाळी राम जन्माचे किर्तन होईल. दि. १८एप्रिल रोजी सकाळी ९ते ११ दरम्यान काल्याचे किर्तन होणार आहे. या कथेला गायक व वादक संदीप महाराज नरके,



गौरव महाराज झुंजे, तुषार भुजबळ, बाबासाहेब भोर यांची साथ संगत असणार आहे. यावेळी श्रीराम सेवा मंडळाचे अध्यक्ष बबन फुले, उपाध्यक्ष बाळासाहेब होळकर , माजी सरपंच दिलीप होळकर, बबन बेल्हेकर, रामदास फुले, बाळासाहेब बेल्हेकर , मारुती कावरे , चंद्रकांत खरमाळे, एकनाथ होळकर, अमोल चौगुले , श्रीनिवास महाराज जपकर , बबन शिंदे ,बाबासाहेब जाधव, विष्णू गुंजाळ, योगेश कुलकर्णी , प्रीती कुलकर्णी, बंडू रावळे, भानुदास फुले, राजू फुले, राजाराम जपकर, पोपट मोरे , पोपट कोल्हे, जालिंदर शिंदे, प्रभाकर चहाळ, पाराजी होळकर, रावसाहेब इंगोले, सुरेश चत्तर, गुलाब होळकर ,दादाभाऊ फुले, रावसाहेब पुंड , बाबासाहेब रावळे ,दादू थोरात,दत्तू थोरात, शंकर इंगोले, श्रीराम सेवा मंडळाचे सर्व सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी रावसाहेब भागीनाथ होळकर यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी परिसरातील भाविकांनी व ग्रामस्थांनी महाप्रसाद व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीराम सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे .

सतरंग फौंडेशन आणि हिमसह्याद्री ट्रेकर्स ग्रुपचा अभिनव उपक्रम

# पशुपक्ष्यांची तहान भागवण्यासाठी वांबोरी घाटातील पाणवठा टँकरच्या पाण्याने भरला

**समाचार/नगर**

उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याने नैसर्गिक जलस्त्रोत आटू लागले आहेत. त्यामुळे या पाणवठ्यावर तहान भागवण्यासाठी येणारे वन्यजीव, पक्षी यांच्यासमोर मोठा प्रश्न निर्माण होतो. नगरजवळील वांबोरी घाट, डोंगरगण परिसरातील नैसर्गिक दरीमध्ये असणारा पाणवठा कोरडा पडला होता. त्यामुळे सतरंग फौंडेशन आणि हिमसह्याद्री ट्रेकर्स ग्रुपच्या वतीने या पाणवठ्यात टँकरने पाणी सोडून पाणवठा भरण्यात आला. पाणी येताच परिसर पुन्हा एकदा पक्षांच्या किलबिलाटाने प्रफुल्लित झाला. छाया खर्डे, स्वाती चंगेडीया, रवी राठोड, अभिजित दहातोंडे, मयुर राहिंज, निसर्ग भ्रमंती ग्रुपचे डॉ. अभिजित होशिंग, रामभाऊ जगताप, दिनेश राऊत, निशिकांत महाजन, नितीन केदारी, प्रसाद खटावकर, धीरज खिस्ती, विनायक कुलथे, प्रशांत पठारे, विद्यासागर पेटकर, वनविभागाचे दाणी, स्थानिक नवनाथ ससे, बर्डे, सतिष कदम व इतर ग्रुपचे सदस्य या उपक्रमात सहभागी झाले होते.



यावेळी सर्वांनी डोंगरगण येथील जैवविविधता उद्यानालाही भेट दिली. छाया खर्डे म्हणाल्या, निसर्गाच्या सान्निध्यात रममाण होणे सगळ्यांनाच आवडते. त्याचवेळी या निसर्गाचा भाग असलेले, तेथील नैसर्गिक जलस्त्रोतावर अवलंबून असलेल्या पशुपक्ष्यांचीही काळजी आपण घेतली पाहिजे. उन्हाळ्यात गावोगावी टँकरने पिण्याचे पाणी पुरविले जाते. त्याच धर्तीवर हा नैसर्गिक पाणवठा टँकरने पाणी आणून भरला आहे. त्यामुळे या परिसरातील पशुपक्ष्यांची तहान भागणार आहे.


**शेतजमीन विकणे आहे**


नेप्ती कल्याण रोड येथे ३ एकर शेतजमीन विकणे आहे

8446441098

**m डागा**
**शांतीलाल डागा**
दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकामाची रांगोळी

**SASE DCORATERS**



Mandap, Light & Flower Decoraters

Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar

9822331006, 9579544110

UNITED PHARMA
Sargical & Generic Medicine

**UNITED PHARMA**
Pharmaceutical Distributors
Near Kedgaon Ves, Kedgaon
90 49 93 44 44
79 72 37 80 81
98 22 02 06 49


## जाहीर नोटीस उत्तर

तमाम लोकांना विशेषतः १) कैलास नामपेल्ली उषाकोयल, २) रत्नमाला कैलास उषाकोयल, ३) सचिन कैलास उषाकोयल, ४) आकाश कैलास उषाकोयल, ५) राजेंद्र लक्ष्मण श्रीगादी ६) श्रीशैलम लक्ष्मण श्रीगादी, ७) श्रीनिवास लक्ष्मण श्रीगादी, ८) अंबादास लक्ष्मण श्रीगादी व ९) शशिकला सत्यनारायण मिठापेल्ली यांस नियोजित लोकमंगल गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादितचे मुख्य प्रवर्तक व प्रवर्तक या जाहीर नोटीस उत्तराने कळविण्यात येते की,

खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत नियोजित लोकमंगल गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, नालेगाव यांचे मालकी वहिवाटीची असून, सदर संस्थेचे मुख्य प्रवर्तक प्रकाश भुमय्या कोटा व अशोक बाळु पुंड हे आहेत. तुम्ही दिनांक १४.०८.२०२३ रोजी दैनिक समाचार या वृत्तपत्रात ॲड. काकासाहेब महादेव कोठुळे यांचेमार्फत प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीसीप्रमाणे सदर परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीसंदर्भात कोणाबरोबरही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केलेला नाही व त्यांचे वतीने अन्य तिऱ्हाईत इसमाबरोबर परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा अगर हस्तांतरणाचा व्यवहार केलेला नाही, तसेच सदर मिळकतीवर बोजा निर्माण केलेला नाही व कोणाचाही फसवणूक केलेली नाही. त्याचप्रमाणे कोणाचेही सभासद या नात्याने, तसेच करारान्वये प्राप्त हक्क व अधिकार डावलण्याचे इराद्याने हस्तांतर करण्याचे प्रयत्न केलेले नाहीत. कोणताही गैरव्यवहार केलेला नाही.

वास्तविक पाहता सदर वर्तमानपत्रात नियोजित संस्थेचे मुख्य प्रवर्तक प्रकाश भुमय्या कोटा व अशोक बाळु पुंड व सदर नियोजित लोकमंगल गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित संदर्भात चुकीच्या माहितीच्या आधारावर जी जाहीर नोटीस प्रसिद्ध करून त्याची बदनामी करण्याचा प्रयत्न चालविला आहे. तो थांबवावा, तसा जाहीर खुलासा पुन्हा सदर वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावा, अन्यथा संस्थेच्या वतीने आपल्या विरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करावी लागेल, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :- जिल्हा तुकडी अहमदनगर, पोट तुकडी तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मोजै नालेगांव येथील सर्व्हे नं. ६७/२/४ चे क्षेत्र ०हे. ९४.४० आर यांसी चतुःसीमा- महसूल रेकॉर्डप्रमाणे. यातील वागणुकीचे व वहिवाटीचे हक्कांसह काही एक राखून ठेविता संपूर्ण मिळकत.

दि. १३/४/२०२४ (शिक्का)

मुख्य प्रवर्तक / प्रवर्तक
**नियोजित लोकमंगल गृहनिर्माण सहकारी संस्था, अहमदनगर.**

## नगर अर्बन को-ऑप.बँक लि.,अहमदनगर (मल्टी-स्टेट शेडयुल्ड बँक), अहमदनगर U/L

बँक रोड, पोस्ट बॉक्स नं. ७, अहमदनगर - ४१४ ००१.

### ताबा नोटीस

रुल८(१) नुसार

ज्याअर्थी प्राधिकृत अधिकारी नगर अर्बन को. ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांनी सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (ऍक्ट)२००२ ( 54 of 2002 ) अन्वये सदर कायद्याचे कलम १३ (१२) व नियम ८ अन्वये **मे. श्री.साईकृपा कलेक्शन प्रो.प्रा.सौ.मुस्कान घनश्याम सचदेव व जामिनदार** यांना दिनांक २८/०७/२०२१ रोजी मागणी नोटीस पाठवून त्यांना दिलेल्या नजरगहाण कर्जाची दिनांक ३०/०६/२०२१ ची **येणेबाकी रक्कम रु. ५,२६,१५४/-** (अक्षरी रु.पाच लाख सहवीस हजार एकशे चोपन्न फक्त) व दि. ०१/०७/२०२१ पासून त्यावरील होणारे व्याज अशी एकूण रक्कम ६० दिवसाचे आत भरणा करणेची मागणी केलेली होती.

परंतु ज्याअर्थी वर उल्लेख केलेले कर्जदार त्यांचे जामीनदार यांनी नोटिसी मध्ये मागणी केलेल्या रकमेचा भरणा केलेला नसल्याने उपरोक्त कर्जदार व त्यांचे जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते कि, सीक्युरिटायझेशन कायदा कलम १३(४) व नियम ८अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी यांनी खाली उल्लेख केलेल्या मिळकतीचा **प्रतिकात्मक ताबा दिनांक ०४/०४/२०२४** रोजी घेतला असून विशेषतः उपरोक्त कर्जदार, जामीनदार व सामान्य तमाम जनतेस कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेबाबत कसलाही व्यवहार करण्यात येऊ नये आणि सदर मालमत्तेच्या कोणत्याही व्यवहारावर नगर अर्बन को-ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांची नजरगहाण कर्जाची दिनांक ३०/०६/२०२१ ची येणेबाकी रक्कम रु. ५,२६,१५४/- (अक्षरी रु.पाच लाख सहवीस हजार एकशे चोपन्न फक्त) व दि. ०१/०७/२०२१पासून त्यावरील होणारे व्याजच्या रक्कमेसह बोजा राहील.

**अ)कर्जदार सौ.मुस्कान घनश्याम सचदेव यांच्या नावावरिल असलेल्या अचलमालमत्तेचे वर्णन:-**

जिल्हा तुकडी अहमदनगर पो.तु.ता.नगर पैकी,अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील नवीन सर्व्हे नं.४२/३,जुना सर्व्हे नं.३७/३,प्लॉट नं.७ ,क्षेत्रफळ ५५३.३४ चौ.मी. यामध्ये असलेल्या 'लॅंडमार्क व्हेन्यु ' या इमारतीमधील स्टिल्ट थर्ड फलोअर (तिसरा मजला )वरील फलॅट नं.३०३ चे बिल्टअप एरीया ५२.९२१ चौ.मी.सेलेबल एरिया ७४.४२८ चौ.मी.हि मिळकत यासी चतु: सीमा खालील प्रमाणे :-

**पूर्वेस :-** फ्लॅट नं.३०१ व जिना
**पश्चिमेस:-** ओपन टु स्काय
**दक्षिणेस:-** फ्लॅट नं.३०२
**उत्तरेस :-** ओपन टु स्काय

तारीख : ०४/०४/२०२४
ठिकाण : मौजे सावेडी, अहमदनगर
तालुका- नगर. जिल्हा-अहमदनगर

**प्राधिकृत अधिकारी**
नगर अर्बन को. ऑप.बँक (मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
केंद्राशासानाधिन अवसायाना अंतर्गत, अहमदनगर.

## नगर अर्बन को-ऑप.बँक लि.,अहमदनगर (मल्टी-स्टेट शेडयुल्ड बँक), अहमदनगर U/L

बँक रोड, पोस्ट बॉक्स नं. ७, अहमदनगर - ४१४ ००१.

### ताबा नोटीस

रुल८(१) नुसार

ज्या अर्थी प्राधिकृत अधिकारी नगर अर्बन को. ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांनी सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल सेटस अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटीइंटरेस्ट (ऍक्ट)२००२ ( 54 of 2002 ) अन्वये सदर कायद्याचे कलम १३ (१२) व नियम ८ अन्वये **मे.गणेश इंजिनिअरिंग प्रो.प्रा.श्री अमित अरुण बारवकर आणि त्यांचे जामीनदार** यांना दिनांक २१/०८/२०२० रोजी मागणी नोटीस पाठवून लघुउदयोग नजरगहाण कर्जाची दिनांक ३१/०७/२०२० ची **येणेबाकी ८४,७९,७२४/-** (अक्षरी चौ-याऐंशी लाख एकोणऐंशी हजार सातशे चोवीस मात्र)+दिनांक ०१/०८/२०२० पासून त्यावरील होणारे व्याज अशी एकूण रक्कम ६० दिवसाचे आत भरणा करणेची मागणी केलेली होती.

परंतु ज्या अर्थी वर उल्लेख केलेले कर्जदार मे.गणेश इंजिनिअरिंग प्रो.प्रा.श्री अमित अरुण बारवकर आणि त्यांचे जामीनदार यांनी नोटिसीमध्ये मागणी केलेल्या रकमेचा भरणा केलेला नसल्याने उपरोक्त कर्जदार व त्यांचे जमीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते कि, सीक्युरिटायझेशन कायदा कलम १३(४) व नियम ८ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी यांनी खाली उल्लेख केलेल्या मिळकतीचा **प्रतिकात्मक ताबा दिनांक ०४/०४/२०२४** रोजी घेतला असून विशेषतः उपरोक्त कर्जदार, जामीनदार व अन्य आणि सामान्य तमाम जनतेस कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेबाबत कसलाही व्यवहार करण्यात येऊ नये आणि सदर मालमत्तेच्या कोणत्याही व्यवहारावर नगर अर्बन को-ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांचा लघुउदयोग नजरगहाण कर्जाची दिनांक ३१/०७/२०२० ची येणेबाकी ८४,७९,७२४/- (अक्षरी चौ-याऐंशी लाख एकोणऐंशी हजार सातशे चोवीस मात्र )+दिनांक ०१/०८/२०२० पासून त्यावरील होणाऱ्या व्याजाच्या रक्कमेसह बोजा राहील.

**अ) जामिनदार श्री अरुण कोंडाजी बारवकर यांचे तारण घेतलेल्या अचलमालमत्तेचे वर्णन:-**

डिस्ट्रिक्ट अहमदनगर सब डिस्ट्रिक्ट अहमदनगर ता. नगर पैकी मौजे भिस्तबाग येथिल अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील स.पं.२५/२ यातील प्लॉट नं.८२ याचे क्षेत्रफळ ३२४ चौ.मी.हा संपूर्ण प्लॉट यावरील आरसी.सी. मध्ये केलेल्या दुमजली बांधकामासह (बांधकामाचे क्षेत्र १७८.८५ चौ.मी.) हि संपूर्ण मिळकत यासी चतुःसीमाखालील प्रमाणे.

**पूर्व :-** अंतर्गत रस्ता
**पश्चिम:-** प्लॉट नं.८१
**दक्षिण:-** प्लॉट नं.८३
**उत्तर:-** अंतर्गत रस्ता

तारीख : ०४/०४/२०२४
ठिकाण : मौजे भिस्तबाग, तालुका-अ.नगर,
जिल्हा- अहमदनगर

**प्राधिकृत अधिकारी**
नगर अर्बन को. ऑप.बँक
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
केंद्राशासानाधिन अवसायाना अंतर्गत, अहमदनगर.

## नगर अर्बन को-ऑप.बँक लि.,अहमदनगर (मल्टी-स्टेट शेडयुल्ड बँक), अहमदनगर U/L

बँक रोड, पोस्ट बॉक्स नं. ७, अहमदनगर - ४१४ ००१.

### ताबा नोटीस

रुल८(१) नुसार

ज्या अर्थी प्राधिकृत अधिकारी नगर अर्बन को. ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांनी सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल सेटस अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटीइंटरेस्ट (ऍक्ट)२००२ ( 54 of 2002 ) अन्वये सदर कायद्याचे कलम १३ (१२) व नियम ८ अन्वये **श्री. विकास गोरक्ष उबाळे आणि त्यांचे जामीनदार** यांना दिनांक २२/०७/२०२० रोजी मागणी नोटीस पाठवून **घरबांधणी कर्जाची दिनांक ३०/०६/२०२० ची येणेबाकी २०,४८,९८०/-** (अक्षरी वीस लाख अठ्ठेचाळीस हजार नऊशे ऐंशी मात्र )+दिनांक ०१/०७/२०२० पासून त्यावरील होणारे व्याज अशी एकूण रक्कम ६० दिवसाचे आत भरणा करणेची मागणी केलेली होती.

परंतु ज्या अर्थी वर उल्लेख केलेले कर्जदार श्री.विकास गोरक्ष उबाळे आणि त्यांचे जामीनदार यांनी नोटिसीमध्ये मागणी केलेल्या रकमेचा भरणा केलेला नसल्याने उपरोक्त कर्जदार व त्यांचे जमीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते कि, सीक्युरिटायझेशन कायदा कलम १३(४) व नियम ८ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी यांनी खाली उल्लेख केलेल्या मिळकतीचा **प्रतिकात्मक ताबा दिनांक ०४/०४/२०२४** रोजी घेतला असून विशेषतः उपरोक्त कर्जदार, जामीनदार व अन्य आणि सामान्य तमाम जनतेस कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेबाबत कसलाही व्यवहार करण्यात येऊ नये आणि सदर मालमत्तेच्या कोणत्याही व्यवहारावर नगर अर्बन को-ऑप. बँक ली. अहमदनगर (मल्टि स्टेट शेड्युल्ड बँक) यांचा घरबांधणी कर्जाची दिनांक ३०/०६/२०२० ची येणेबाकी २०,४८,९८०/- (अक्षरी वीस लाख अठ्ठेचाळीस हजार नऊशे ऐंशी मात्र )+दिनांक ०१/०७/२०२० पासून त्यावरील होणाऱ्या व्याजाच्या रक्कमेसह बोजा राहील.

**अ) कर्जदार श्री विकास गोरक्ष उबाळे यांचे तारण घेतलेल्या अचलमालमत्तेचे वर्णन:-**

डिस्ट्रिक्ट अहमदनगर सब डिस्ट्रिक्ट अहमदनगर तालुका नगर पैकी मौजे नवनागापूर (मौजे नागापूर येथील जुना सर्व्हे नंबर ८२/३ )येथील मा दुय्यम निबंधक साहेब अहमदनगर यांचे अधिकार कक्षेतील व जिल्हा परिषद हद्दीतील बिनशेती प्लॉट व त्यावरील रो हाऊस बांधकामासह सर्व्हे नंबर ७२/३ ,प्लॉट नंबर ५९ ,एकूण क्षेत्र २००.००चौरस मीटर यापैकी पुर्वेकडील १००.०० चौ.मी.बिनशेती प्लॉट व त्यावरील रो हौकसंग स्किम मधील रो हाऊस ब्लॉक नंबर ५९ व त्यावर आर सीसी मध्ये ३ रुम ,संडास, बाथरुम असे बांधकाम झालेले असून त्यांचे बांधकाम क्षेत्र फळ ४८.३६८ चौरस मीटर आहे. हा संपुर्ण बिनशेती प्लॉट व या प्लॉट मिळकतीवर असलेले बांधकाम लाईट मिटर,लाईट फिटींग इत्यादीसह रो हाऊस घर मिळक यासी चतुःसीमाखालील प्रमाणे.

**पूर्वेस :-** ओपन स्पेस
**पश्चिम:-** रो हौसिंग ब्लॉक नंबर ५९ ब.
**दक्षिण:-** मीटर रस्ता
**उत्तर:-** रो हौसिंग ब्लॉक नंबर ५८ अ.

तारीख : ०४/०४/२०२४
ठिकाण : मौजे नागापूर
तालुका-अहमदनगर, जिल्हा- अहमदनगर

**प्राधिकृत अधिकारी**
नगर अर्बन को. ऑप.बँक
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
केंद्राशासानाधिन अवसायाना अंतर्गत, अहमदनगर.


टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

**दिनांक - १२ एप्रिल ते १८ एप्रिल २०२४**



| चित्रपट | वेळ |
|---|---|
| बडे मियाँ छोटे मियाँ | 8.00 AM<br>11.15 AM<br>2.20 PM<br>4.25 PM<br>7.45 PM<br>10.00 PM<br>10.55 PM |
| मैदान | 8.15 AM<br>11.45 AM<br>1.00 PM<br>3.15 PM<br>8.45 PM<br>10.15 PM |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | 9.30 AM |
| GODZILLA X KONG | 5.30 PM |
| CREW | 7.30 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show

**CONNPLEX**

AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.

Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस आमचे अशिल यांनी दिलेली माहितीवरून या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही **गंगाधर बाबाजी फलके** यांच्या खरेदी मालकी व कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकतीच्या खरेदीबाबत आमच्या अशिलाबरोबर खरेदी-विक्रीचा व्यवहार ठरलेला आहे. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजा विरहीत असून, तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध नसल्याबाबतची खात्री व भरवसा दिला आहे. तथापि सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, तोंडी अथवा लेखी करार, खरेदीखत, साठेखत, लिज, इजमेंट, मनाईहुकूम, बक्षीस, वारस हक्क, ॲटॅचमेंट, खाजगी अथवा सरकारी, निमसरकारी बोजा असल्यास, कोणत्याही स्वरुपाचा हक्क अधिकार असल्यास त्यांनी त्यांच्या हक्काबाबत ही नोटीस प्रसिद्ध होताच ७ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही, असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गृहित धरून व सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी आहे, असे ग्राह्य धरून आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. **परिशिष्ट** - डि।। अहमदनगर सब डि।। व ता. नगरपैकी **मौजे केडगाव** येथील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कार्यक्षेत्रातील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बिगरशेती प्लॉट मिळकतीचे खालील वर्णनाची -

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ७५ | ४७ | ३३८.०२ चौ. मी. |

यापैकी विद्यमान मालकाच्या नावावरील पश्चिम बाजूचे संपूर्ण क्षेत्र ६५.०५ चौ. मी. ही मिळकत

यांसी चतुःसीमा :-

| पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
|---|---|---|---|
| प्लॉट नंबर पैकी भाग | अंतर्गत रस्ता | प्लॉट नंबर ४६ | प्लॉट नंबर ४६ |

येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक प्लॉट मिळकत तदंगभूत वस्तूसह व वहिवाटीच्या हक्कांसह काही एक राखून न ठेविता असे.

**तारीख : १३/०४/२०२४**

**ॲड. अशोक हिरालाल पालवे**
ऑफिस - श्रीराम कॉलनी पाठीमागे, पालवे मळा, केडगाव, अहमदनगर. मो. नं. ९३७१२२२६८९


Milk & Cream Icecream Product

HATSUN Daily Arun ICECREAMS



प्रो‍प्रा : किशोर मुदगल
डी-१२, एमआयडीसी अहमदनगर 7219515144


## THE UNITED CHURCH BOARD FOR WORLD MINISTRIES

(Formerly known as The American Board of Commissioners for Foreign Missions)

OFFICE OF THE PRESIDENT

Regd. Office : Mission Business Office, 276, Dr.D.N.Road, Fort Bombay 400 001.
Corresponding Office : All communication should be address to Secretary UCBWM/Marathi Mission, Ahmednagar Boys High School, Station Road, Ahmednagar (M.S.) India-414001, Ph.(0241) 325969, 344633

### निविदा / टेन्डर नोटीस

युनायटेड चर्च बोर्ड फॉर वर्ल्ड मिनिस्ट्रीज पी.टी.आर.ई-९२२ मु आणि मराठी मिशन पी.टी.आर. एफ-२८७ मु या न्यास संस्थेची मौजे राहुरी येथील सिटी सर्व्हे क्र.७६८, ७६९, ७७०, २९अ१, २९अ२, २९अ३, ३३ब, २४, २८/२ब, ९६१ ते ९६८, ८५५ यापैकी सुमारे ३ एकर ही मिळकत विकसित / विक्री/ डेव्हलपमेंट /लिजने देण्याकरिता आणि राहुरी येथे ओ.सी.पी.एम. स्कूल, मराठी शाळा, नवीन इंग्रजी शाळा, होस्टेल मुले + मुली, हॉस्पिटल, कर्मचारी निवासस्थाने व अमेरिकन मराठी मिशनचे लाभार्थी यांचेसाठी घरे बांधावयाची आहेत.

अहमदनगर येथे जुन्या वसंत सिनेमासमोर स्ट्रिप ऑफ लँड मध्ये शैक्षणिक व व्यापारी संकुल, अंदाजे बांधकाम २,००,००० स्क्वे. फूट सी.टी.एस. ३५६ अबक रोझ कॉटेज, (वाय.एन.सी.ए.) येथे व्यावसायिक गाळे, दवाखाना अंदाजे बांधकाम १,००,००० स्क्वे, फूट सी.टी.एस.२४१३/७ मध्ये शैक्षणिक व व्यापारी संकुल, युनियन अध्यापक विद्यालय डी.एड., बी.एड. कॉलेज व इंग्रजी माध्यमांची शाळा, होस्टेल अंदाजे बांधकाम १,००,००० स्क्वे.फूट महाबळेश्वर येथे बंगले डेव्हलप करणे, वाई येथे नियोजित मिशन मेडिकल कॉलेज बिल्डींग बांधणे, वाई येथे सेंट थॉमस स्कूल बिल्डींग बांधणे.

वडाळा, बहिरोबा, ता.नेवासा, जि.अ.नगर येथे प्राथमिक, माध्यमिक शाळा, ज्युनिअर कॉलेज, मुलांकरिता होस्टेल अंदाजे ५०,००० स्क्वे.फुटाचे बांधकाम सर्व आधुनिक सुविधांसह करावयाचे आहे. तसेच नगर-औरंगाबाद रोडवर शैक्षणिक व व्यापारी संकुल अंदाजे १,००,००० स्क्वे.फुटाचे बांधकाम करायचे आहे. तसेच एफ.जे.एफ.एम. नवीन हॉस्पिटल बिल्डींग, पॅरामेडीकल इन्स्टिट्यूट, नर्सिंग कॉलेज, कर्मचारी निवासस्थाने, लाभार्थींसाठी घरे इ. बांधकामे करावयाचे आहेत. त्याकरिता निविदा मागविण्यात येते आहेत. इच्छुक व्यक्ती / फर्म/ बांधकाम व्यावसायिक यांनी आपले टेंडर दि.३०/०४/२०२४ पर्यंत खालील नमूद पत्त्यावर पाठवावीत.

सदरच्या मिळकतीची विक्री / डेव्हलपमेंट हे मा. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचे मंजुरीचे अधीन राहून करण्यात येईल. निविदा अर्ज संस्थेच्या खालील पत्त्यावर उपलब्ध आहेत.

कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार संस्थेचा राहील.

**निविदा पाठविण्याचा पत्ता**
एम.एम.ॲण्ड डब्ल्यू, सी.एम.प्रोग्राम ऑफिस
युनायटेड चर्च बोर्ड फॉर वर्ल्ड मिनिस्ट्रीज
आणि मराठी मिशन
होलीयोक बंगला, क्लेरा ब्रुस गर्ल्स,
स्कूल कम्पाउंड, स्टेशन रोड, अहमदनगर-४१४००१

(शिक्का)

अध्यक्ष/सचिव/ट्रस्टी
**डॉ. विजया अ.जाधव**
Chairman/Secretary/Trustee
Marathi Mission (A.M.M.)
And Wider Church Ministries
U.C.B.W.M)
**डॉ.डी.जी.भांबळ**




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
(१४ एप्रिल १८९१-६ डिसेंबर १९५६)

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार

# महामानव

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त

**विनम्र अभिवादन!**

www.mahasamvad.in /MahaDGIPR /MaharashtraDGIPR

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन